# आजचा सुधारक

विवेकवादी चिंतनाला वाहिलेली ग्रंथमाला




# विस्थापन

# या अंकात


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | धर्म : परंपरा आणि परिवर्तन - 2 | रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ | 3-10 |
| 2. | जीएमओ | डॉ.तारक काटे | 11-17 |
| 3. | मूठभर माती | अरविंद गुप्ता | 18-24 |
| 4. | हाजी अली सब के लिये | - | 25-31 |
| 5. | अनुभव : लाल सलाम | उत्पल व.बा. | 32-39 |
| 6. | साक्षात्कारामागील वैज्ञानिक सत्य - 1 | डॉ. रवीन्द्र टोणगांवकर | 40-44 |
| 7. | प्रतिसाद | लखनसिंग कटारे<br>वसंत केळकर | 45-47 |
| 8. | कविता : वात्सल्याचे तपशील | केशव सखाराम देशमुख | 48 |


**मुखपृष्ठावरील चित्र आंतरजालावरून**


संस्थापक संपादक
**दि. य. देशपांडे**

संपादक
**रवीन्द्र रुक्मिणी पंढरीनाथ**

प्रकाशन – 3 जून 2016
प्रकाशकः भरत मोहनी, श्रीमोहिनीराज, खरे टाऊन, धरमपेठ, नागपूर 440010.
मुद्रकः नितीन तापस, श्याम ब्रदर्स, एस.टी.स्टँड रोड, नागपूर-18.
किरकोळ प्रत – रु.30 फक्त



**संपर्कः**
रवीन्द्र रुक्मिणी पंढरीनाथ ravindrarp@gmail.com
editor.sudharak@gmail.com
भरत मोहनी bharat_i@yahoo.com (9822736808)



ही ग्रंथमाला संक्षिप्त स्वरूपात www.aajachasudharak.in वर प्रकाशित होते, संपूर्ण ग्रंथमाला मुद्रित पुस्तकाच्या स्वरूपात हवी असल्यास वर्षभरासाठी रु.300 व्यक्तीसाठी आणि रु.350 संस्थेसाठी पाठवून सभासद व्हावे. सभासद शुल्क मनीआर्डर अथवा पेयेबल अट पार चेक ने आजचा सुधारक, 201, श्रीमोहिनीराज, खरे टाऊन, धरमपेठ, नागपूर-440010. येथे पाठवावे.

# धर्म : परंपरा आणि परिवर्तन – 2

*रवीन्द्र रुक्मिणी पंढरीनाथ*

ख्रिश्चन धर्म, रोमन कॅथॉलिक, पोप फ्रान्सिस

---------------------------------------------------------------------------

प्रत्येक धर्मातील परंपरा व परिवर्तन ह्यांच्यातील संघर्षाचा वेध घेणाऱ्या लेखमालेतील कॅथॉलिक पंथातील ह्या प्रक्रियेचे चित्रण करणारा व त्यातील पोप फ्रान्सिस ह्यांचे कर्तृत्व अधोरेखित करणारा हा लेख..

---------------------------------------------------------------------------

हिंदू धर्माच्या मोकळ्याढाकळ्या रचनेमुळे, अनेकेश्वरी उपासनापद्धतींमुळे व सर्वसमावेशक लवचिकतेमुळे त्यात परंपरा आणि परिवर्तन ह्यांमधला लढा दीर्घकाळ चालत राहू शकला. इंग्रजी राजवट आल्यावर येथील सामाजिक- राजकीय -आर्थिक संरचनांना मुळापासून हादरे बसले व त्यातूनच हिंदू धर्मीयांनी आपल्या धर्माच्या चिकित्सेला प्रारंभ केला. भक्तिसंप्रदायाचा वारसा मानणारे गांधी-विनोबा-साने गुरुजी, अन्य पुरोगामी परंपरांतून आलेल्या अरविंद – विवेकानंद-कृष्णमूर्ती प्रभृतींनी हिंदू धर्माच्या तत्त्वज्ञानाची व आचाराची पुनर्मांडणी केली. फुले-आगरकर-पेरियार-राममोहन रॉय इ. विवेकवादी सुधारकांनीही सुशिक्षित हिंदूंचे मानस परिवर्तनासाठी अनुकूल बनविले. ह्या साऱ्यामुळे विसाव्या शतकात इतर धर्मांच्या तुलनेत हिंदू धर्म हा अधिक गतिमान, परिवर्तनशील, व विज्ञानाभिमुख राहू शकला.

त्या तुलनेत ख्रिश्चन धर्माची स्थिती कठीण होती. युरोपमध्ये प्रबोधनाला (renaissance) प्रारंभ झाला व विज्ञानाने धर्माला अतिशय अवघड प्रश्न विचारले तेव्हाच बायबलमधील सृष्टिनिर्मिति- सिद्धान्ताला हादरे बसू लागले. पृथ्वी हे विश्वाचे केंद्र आहे, ईश्वराने सहा दिवसांत सृष्टीची निर्मिती केली, मानवप्राणी ही खुद्द ईश्वराची निर्मिती आहे, ह्या साऱ्या कल्पना मोडीत निघाल्या. पण अनेक शतके जगातील बहुतेक प्रदेशांवर राज्य केल्यामुळे तसेच ‘आपणच ईश्वराचे लाडके पुत्र’ अशी स्वतःची समजूत करून घेतल्यामुळे विज्ञान व

जगातील बदलती राजकीय-आर्थिक समीकरणे ह्यांनी उभे केलेले प्रश्न ह्यांच्या आरशात पाहून स्वतःला बदलण्याऐवजी ख्रिश्चनधर्माच्या अध्वर्यूंनी ग्रंथप्रामाण्याची व हटवादीपणाची भूमिका घेतली.

ख्रिश्चनधर्मदेखील एकसंध नाही. रोमन कॅथॉलिक व प्रॉटेस्टंट हे त्यातील दोन मुख्य पंथ व अनेक उपपंथ आहेत . (भारतात तर जातीनिहाय वेगळी चर्चेसही आहेत.) त्यांपैकी रोमन कॅथॉलिक पंथ हा अधिक जुना व कट्टर. प्रॉटेस्टंट पंथाचा जन्मच मुळात रोमन कॅथॉलिक चर्चच्या कट्टरतेविरुद्ध बंड पुकारण्यातून (protest) झाला असल्यामुळे त्याला परिवर्तनाचे थोडेतरी वारे लागलेले आहे. पण रोमन कॅथॉलिक चर्च म्हणजे सनातन्यांचा बालेकिल्ला. त्याचे मुख्यालय असलेल्या व्हॅटिकनला स्वतंत्र राज्याचा (देशाचा) दर्जा आहे. ह्या चर्चची - धर्माचे नियमन करणाऱ्या संस्थेची - बांधणी चिरेबंदी पद्धतीने करण्यात आली आहे. येथील धर्मसत्ता व राज्यसत्ता आधी एकच होती, नंतरही त्या हातात हात घालूनच चालल्या. त्यामुळे चर्चचे संघटन स्थानिक पातळीपासून ते आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत श्रेणीबद्धतेने उभे राहिले. विविध पातळ्यांवरील धर्मोपदेशकांची निवड, प्रशिक्षण, धर्माचा प्रचारप्रसार, नित्य-नैमित्तिक धार्मिक सोहळे ह्यांचे आयोजन, अर्थकारण, राजकारण व व्यवस्थापन ह्या साऱ्यांची एक सुनिश्चित पद्धत लावण्यात आली. चर्च हे केवळ ह्या पंथाच्या अनुयायांचे प्रार्थनास्थळ नाही, तर ते त्यांच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनाचे व राजकीय शिक्षणाचेही केंद्र असते. अशा रीतीने चिरेबंदी रचना, उपासनापद्धतीचे ठाशीव स्वरूप व अमर्याद राजकीय सत्ता/राज्याश्रय लाभल्यामुळे आलेला अहंकार ह्यांमुळे काळानुसार प्रवाही राहणे ख्रिश्चन धर्माला, विशेषतः रोमन कॅथॉलिक पंथाला शक्य झाले नाही.

विसाव्या शतकात रोमन कॅथॉलिक चर्चची विचारसरणी व आचारपद्धती ह्यांच्यावर अनेक हल्ले झाले, पण चर्चने आपले 'मूळ धोरण' काही सोडले नाही. त्याचा आपल्या अनुयायांच्या मनावरील पगडा काही अंशी कमी झाला, तरी कोट्यावधी लोकांवरील प्रभाव मात्र टिकून राहिला. ह्या चर्चवर कधी धर्मगुरूंनी लहान मुलग्यांचे ( व कधी स्त्रियांचे) लैंगिक शोषण केल्याचा, कधी चर्चने वसाहतवादास खतपाणी घातल्याचा, युरोपियन देशांच्या साम्राज्यवादास बळ पुरविल्याचा आणि करुणा हा ख्रिस्ताच्या उपदेशाचा गाभा विसरून तख्त-तिजोरी-तलवार ह्यांचे आश्रित बनल्याचा आरोप झाला. एकीकडे विज्ञानाचे,

त्यातून निर्माण झालेल्या तंत्रज्ञानाचे लाभ घ्यायचे, पण दुसरीकडे विज्ञानाला , वैज्ञानिक विचारपद्धतीला  विरोध करायचा ह्यात चर्चला काही विसंगती वाटत होती असे दिसत नाही. अगदी २०१६ सालात, डार्विनच्या उत्क्रांतीच्या सिद्धान्ताला दीडशेहून अधिक वर्षे उलटून गेल्यावरही, अमेरिकेतील अनेक शाळा-कॉलेजांत उत्क्रांतीच्या सिद्धान्ताऐवजी बायबलमधला नवनिर्मितीचा सिद्धान्त कसा बरोबर आहे हे शिकविण्यात येते. त्यामागे रोमन  कॅथॉलिक चर्चचे जबरदस्त राजकीय लॉबिंग आहे. ह्यावरून हा मुद्दा स्पष्ट व्हावा.

विसावे शतक उजाडले तेव्हा युरोपियन देशांच्या साम्राज्यावरील सूर्य कधी मावळत नव्हता अशी स्थिती होती. जित राष्ट्रे ही असंस्कृत,  रानटी आहेत; त्यांना अंकित करून उलट आम्हीच त्यांच्यावर कृपा केली आहे; कारण ह्या सर्वांना 'आपल्याप्रमाणे' नीट माणूस बनविणे हे गोऱ्या ख्रिश्चन माणसाचे सांस्कृतिक उत्तरदायित्व (white man's burden)  आहे, असे  जे राज्यकर्त्यांना वाटत असे, त्यामागे  चर्चची फार मोठी प्रेरणा होती. पण हे शतक अर्धे उलटेपर्यंत जगात प्रचंड उलथापालथ झाली. धर्म न मानणाऱ्या साम्यवादाने निम्म्या जगावर झेंडा रोवला. त्या विचारसरणीचा पाडाव झाल्यावरही निरीश्वरवादी विचारसरणी जगभरात, विशेषतः प्रगत पाश्चात्त्य देशांत मान्यता पावली. आशिया व अफ्रिकेतले परतंत्र देश स्वतंत्र झाले. दलित-शोषितांना स्वतःचा आवाज सापडला. इंग्रज-पोर्तुगीज-फ्रेंच राज्यकर्ते हे मुक्तिदाते नसून शोषक होते, असे त्यांनी स्पष्टपणे मांडायला सुरुवात केली. गर्भपाताविरुद्ध भूमिका घेणारे चर्च पुरुषी स्वैराचार व दमन ह्यांच्याविरुद्ध , धर्मगुरूंच्या अनैतिक वर्तनाविरुध्द भूमिका घेत नाही, चर्चच्या रचनेत स्त्रियांना कोठेच स्थान नाही ह्याचा निषेध करणारी स्त्री-चळवळ ह्याच काळात उदयाला आली. स्वतःला स्त्रीवादी धर्मशास्त्रज्ञ (feminist theologist) म्हणविणाऱ्या काहींनी तर ईश्वर हा केवळ पिता कसा असेल, तो तर माताही असला पाहिजे असे प्रतिपादन केले. १९७०-८० मध्ये लॅटिन  अमेरिकेत आलेल्या मुक्तीचे धर्मशास्त्र (liberation theology) ह्या विचारसरणीने तर देव, धर्म आणि चर्च ह्यांच्याविषयी अत्यंत मूलभूत प्रश्न उभे केले. त्यांच्या मते येशू हा मुळात गोरगरिबांचा, दीन-दुबळ्यांचा मुक्तिदाता. तो सामान्य माणसांप्रमाणे,  त्यांच्यातला एक होऊन, त्यांची सेवा करीत  जगला व त्यांच्याच उद्धारासाठी मेला. त्यामुळे गरीब-दलित लोकांसाठी काम करणे, त्यांच्या व्यथा दूर करणे, त्यांच्या हक्कांसाठी लढणे ही सर्व धर्मकार्येच

आहेत. किंबहुना अन्याय, शोषण, पृथ्वीचा संहार, युद्ध, विनाश ह्यांच्या विरोधात उभे राहणे हेच चर्चचे खरे काम असायला हवे, असे नवे धर्मशास्त्र ते मांडू लागले. ह्या विचारांचे धर्मगुरु जोवर हालअपेष्टा सहन करत सेवा कार्य करीत होते, तोवर चर्चला काही प्रश्न नव्हता. पण जेव्हा त्यांनी विकासाच्या नावावर होणारे विस्थापन, युद्धखोरी, बहुराष्ट्रीय कंपन्यांनी केलेले शोषण व प्रदूषण ह्या सर्वांविरुद्ध आवाज उठवायला सुरुवात केली, तेव्हा सनातनी चर्चला ते अर्थातच मान्य झाले नाही. त्यामुळे विसाव्या शतकाच्या अखेरीस रोमन कॅथॉलिक चर्चची प्रतिमा ही स्त्री-पुरुषसमतेची विरोधक, विज्ञानविरोधी, अहंमन्य, आपल्या चुकांवर पांघरूण घालणारी अशीच होती. तिसरे जग, स्त्रिया, गरीब, समलैंगिक, वंचित इ. समूह त्यांच्या विचारकक्षेत येत नाहीत, असे चित्र होते. अर्थात ह्या सर्व बाबींवर पुरोगामी भूमिका घेणारे प्रवाहदेखील चर्चमध्ये अस्तित्त्वात होते, पण ह्या संघर्षात परंपरा निःसंशय वरचढ ठरली होती. मात्र पोप फ्रान्सिस ह्यांनी अडीच वर्षांपूर्वी पोपपदाची सूत्रे ग्रहण केली आणि कोणाच्या ध्यानीमनी नसताना परिवर्तनाचा झंझावात सुरू झाला. आजही त्याचा जोर ओसरला नाही, उलट परिवर्तनाच्या विविध पैलूंविषयी अधिकाधिक सुस्पष्ट भूमिका घेत, आतापर्यंत झालेल्या बदलांना स्थैर्य देत, साऱ्या जगातील वंचितांशी, परिवर्तन इच्छिणाऱ्या समूहांशी नाते जोडत तो पुढेच जातो आहे. ह्या लेखातून त्याची धावती ओळख करून घेऊ .

पोप फ्रान्सिस हे लॅटिन अमेरिकेतून निवडले गेलेले पहिलेच पोप होत. ते ह्या जागी आल्या क्षणापासून त्यांचे वेगळेपण लोकांच्या मनावर ठसू लागले. त्यांनी त्या पदासोबत येणार सारा डामडौल नाकारला. व्हॅटिकनच्या बुरुजांवरून अधून मधून आध्यात्मिक प्रवचने देणारा हा धर्मगुरु नसून, लोकांमध्ये जाऊन त्यांच्याशी थेट संवाद साधणारा, कोणत्याही प्रश्नावर न्याय्य भूमिका घेण्यास न कचरणारा 'कर्ता सुधारक' आहे , हे लवकरच दिसून आले. कारण त्यांनी सर्वप्रथम हात घातला तोच सर्वांत कठीण व नाजुक प्रश्नाला. (सक्तीच्या) ब्रह्मचर्यातून मर्यादातिक्रमण घडते हा जगाचा अनुभव आहे, पण कोणताही धर्म ते मान्य करीत नाही. एखाद्या धर्माच्या अधिकारी पुरुषाने लैंगिक अत्याचार केल्याचे मान्य करणे म्हणजे जणू त्या धर्माची बेअब्रू झाल्याची जाहीर कबुली देणे. म्हणून, अशा बातम्या दडपणे, 'हा आमच्या धर्माच्या बदनामीचा कावा आहे' असे म्हणून संबंधित धर्मगुरूला पाठीशी घालणे इ. प्रकार आजवर सर्व

धर्मांचे लोक करीत आले व त्यात निरपराध मुले व स्त्रियांचा हकनाक बळी जात राहिला. पोप फ्रान्सिस ह्यांनी प्रथमच असे गैरप्रकार घडल्याची जाहीर कबुली देऊन त्यासाठी संबंधितांची माफीही मागितली. त्यापुढे जाऊन असे प्रकार भविष्यात घडू नयेत ह्यासाठीची उपाययोजना त्यांनी जाहीर केली व त्वरित अंमलातही आणली. घडल्यास त्या घटनेची चौकशी करण्यासाठी त्यांनी सर्व स्तरांवर एक कायमस्वरूपी यंत्रणा तयार केली. सर्व पातळ्यांवरील धर्मोपदेशकांच्या प्रशिक्षणात 'लैंगिक हिंसा व त्याबद्दलचा चर्चचा दृष्टिकोन' ह्या विषयाचा समावेश केला. मुख्य म्हणजे ह्या सर्व तक्रारींची दाखल घेऊन तिची चौकशी करण्यासाठी त्यांनी एक पारदर्शक प्रणाली तयार केली व त्याची सूत्रे अशा हिंसाचाराची शिकार झालेल्या व त्याविरुद्ध काम करणाऱ्या (survivors of sexual violence ) स्त्रियांच्या गटाकडे दिली. ह्या एका विषयावरील कृतीने पोप फ्रान्सिस ह्यांच्या असामान्य धैर्य , सत्यनिष्ठा व कार्यकुशलता ह्या गुणांचा सर्वांना प्रत्यय आला.

त्यानंतर त्यांनी मागे वळून पहिलेच नाही. समलैंगिकता, अन्यधर्मीय व ख्रिश्चन ह्यांचे नाते, वसाहतवाद, कम्युनिझम, गरिबी, शोषण, पर्यावरणसंहार, ग्लोबल वॉर्मिंग, गर्भपात, स्त्रियांचे हक्क, स्त्रियांचे धर्मातील स्थान, विस्थापन व निर्वासित, पाप-पुण्य, आस्तिक-नास्तिक, स्वर्ग-नरक ... जगातील असा कोणताही विषय नसेल ज्यावर पोप फ्रान्सिस ह्यांनी बेधडक, स्वच्छ व स्पष्ट भूमिका घेतली नाही. चर्चने निषिद्ध मानलेल्या अनेक गोष्टी त्यांनी जाणीवपूर्वक केल्या, अप्रवेश्य मानल्या गेलेल्या स्थानांना आवर्जून भेटी दिल्या. उदा. रशियातील orthodox church व व्हॅटिकन ह्यांचा गेली अनेक शतके उभा दावा होता. तो बाजूला सारून पोप फ्रान्सिस ह्यांनी रशियात जाऊन orthodox churchच्या प्रमुखांची भेट घेतली. 'साम्यवादी' बोलिव्हियाचा दौरा केला. त्यांच्या भाषणानंतर बोलिव्हियाचे राष्ट्राध्यक्ष ईव्हो मोराल्स ह्यांनी त्यांना लाकडावर कोरीव काम केलेली एक भेटवस्तू दिली – तिच्यावर कम्युनिझमचे प्रतीक असलेल्या विळा-हातोड्याची प्रतिकृती कोरली होती व येशू ख्रिस्त त्यातील हातोड्यावर विसावलेला दाखवला होता. गेल्या दोन वर्षांत त्यांनी व्हॅटिकनच्या व्यासपीठावर जगभरातील जनआंदोलनांच्या दोन परिषदा आयोजित केल्या, ज्यांत गरीब, जमिनीपासून वंचित झालेले शेतकरी व बेरोजगार ह्यांचा समावेश होता. ह्यांतील दुसऱ्या परिषदेत सन्माननीय वक्ता

म्हणून ईव्हो मोराल्स ह्यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्या प्रसंगी क्युबातील ख्यातनाम क्रांतिकारक चे गव्हाराचे चित्र असलेले जाकीट मोराल्स ह्यांनी परिधान केले होते. (नागपूरच्या संघकार्यालयात सरसंघचालकांनी किंवा शृंगेरी पीठात शंकराचार्यांनी कन्हैया कुमारला किंवा एखाद्या जहाल स्त्रीवादी कार्यकर्तीला बोलावून त्यांचे भाषण आयोजित केले आहे, आणि वक्त्याने 'देवीची पूजा करणाऱ्यांना स्त्रीचा विटाळ कसा काय होतो?' असे लिहिलेला कुडता घातला आहे, अशी कल्पना करून पाहा.) खाली मी विविध विषयांवर पोप फ्रान्सिस ह्यांची काही उद्धरणे देत आहे, त्यावरून रोमन कॅथॉलिक चर्चमधील प्रस्थापितांना किती जबरदस्त धक्का बसला असेल ह्याची कोणालाही कल्पना करता येईल-

*"मी तुम्हाला अतिशय दुःखाने हे सांगत आहे : देवाच्या नावाखाली आफ्रिकेतील स्थानिक रहिवाशांच्या विरोधात गंभीर स्वरूपाची पापकृत्ये करण्यात आली. .. मी अतिशय नम्रपणे तुम्हा सगळ्यांसमोर क्षमायाचना करीत आहे – केवळ चर्चने केलेल्या अपराधांसाठी नव्हे, तर अमेरिकेचा तथाकथित पाडाव करताना येथील मूळ रहिवाशांच्या विरोधात जे कोणते अत्याचार करण्यात आले असतील, त्यांच्याबद्दलही ... ते सर्व पाप होते, अमर्याद पाप !"*

*"ही (जागतिक) व्यवस्था आता असहनीय झाली आहे: शेतमजुरांना व कामगारांनाही ती असह्य वाटते, तिला सहन करणे समुदायांना अशक्य झाले आहे, लोकांना ती नकोशी झाली आहे .. खुद्द पृथ्वीला, पृथ्वीमातेलाही ती असह्य झाली आहे. .. (कारण) जगातील कोणत्याही प्रत्यक्ष किंवा प्रस्थापित सत्तेला सामान्य जनांना त्यांच्या स्वायत्ततेचा पूर्ण वापर करण्यापासून वंचित करण्याचा अधिकार दिलेला नाही. जेव्हा जेव्हा असे प्रयत्न केले जातात, तेव्हा तेव्हा वसाहतवादाची नवी प्रारूपे निर्माण होतात व त्यातून शांती व न्याय ह्यांना गंभीर धोका उद्भवतो. .. हा नवा वसाहतवाद विविध चेहऱ्यांनी आपल्यासमोर येतो. कधी तो बड्या कॉर्पोरेशन्स, (आंतरराष्ट्रीय) पत संस्था, 'मुक्त व्यापारा'चे करार अशी निनावी रूपे घेतो, तर कधी 'काटकसरीच्या उपायांचे' रूप घेऊन तो गरिबांचे आणि कामगारांचे खपाटीला गेलेले पोट आणखी कसून बांधतो ....(म्हणून ) आपण हे निर्भयपणे सांगितले पाहिजे की आम्हाला परिवर्तन हवे आहे- खरेखुरे परिवर्तन, व्यवस्था बदलणारे परिवर्तन . ज्या व्यवस्थेने कोणत्याही किमतीवर नफा मिळविण्याची मानसिकता निर्माण केली*

आहे, ज्या व्यवस्थेला लोकांच्या सामाजिक बहिष्काराचे किंवा निसर्गाच्या संहाराचे सोयरसुतक नाही, अशी व्यवस्था आपल्याला बदलायलाच हवी.”

“आम्हाला नम्रता, आत्मशोध व प्रार्थनापूर्वक केलेले चिंतन ह्यांतून काही प्रश्नांचा नवा अर्थ गवसला आहे. चर्च आता असे मानत नाही की जेथे (पापी) लोकांना यातना दिल्या जातात, असा नरक खरोखर कोठे अस्तित्वात आहे. कारण असा विचार हा परमकारुणिक ईश्वराच्या अमर्याद प्रेमाच्या संकल्पनेशी विसंगत आहे. ईश्वर हा मानवतेचा परीक्षक नसून तिचा मित्र व प्रिय सखा आहे. ईश्वर तुमचा धिक्कार करण्यासाठी नाही तर तुम्हाला मिठीत घेण्यासाठी आतुर आहे. आदम आणि ईव्हच्या गोष्टीप्रमाणे नरक हादेखील कल्पनेचा भाग आहे. नरक म्हणजे काय, तर अशी स्थिती ज्यात आत्म्याचे परमात्म्याशी मिलन होऊ शकत नाही, तो ईश्वराशी अखेर एकरूप होणारच आहे, पण जेव्हा तो त्याच्यापासून दुरावतो, एकाकी पडतो, ती स्थिती म्हणजे नरक.”

“सर्व धर्म सच्चे आहेत, कारण त्यांच्यावर श्रद्धा ठेवणाऱ्या व्यक्तींच्या हृदयात ते खरोखर वास करतात. ह्यापेक्षा दुसरे सत्य ते काय? भूतकाळात चर्च त्यांना अनैतिक किंवा पापी समजत असे, त्यांच्याबद्दल कठोर भूमिका घेत असे. आम्ही आता न्यायाधीशाच्या खुर्चीत बसून लोकांचा न्यायनिवाडा करणे बंद केले आहे. एखाद्या प्रेमळ पित्याप्रमाणे, आम्ही आमच्या बालकांचा कधीही धिक्कार न करता कायम त्यांच्यावर वात्सल्याचा वर्षाव करतो. आमचे चर्च व्यापक आहे. तिथे भिन्नलैंगिक व समलैंगिक (संबंध ठेवणारे), गर्भपाताचे समर्थक व विरोधी, सर्वांना जागा आहे. येथे पुराणमतवादी व उदारमतवादी दोघांसाठीही अवकाश आहे. अगदी कम्युनिस्टांचेही आम्ही स्वागत करतो व ते आमच्यात सामील झाले आहेत. आम्ही सर्व एकाच देवावर प्रेम करतो व त्याची आराधना करतो.”

“कॅथॉलिक पंथ हा आता आधुनिक व विवेकनिष्ठ धर्म आहे. आम्ही कालानुरूप उत्क्रांत झालो आहोत. आता सर्व प्रकारची असहिष्णुता त्यागण्याची वेळ आली आहे. धर्मातील सत्य हे काळानुसार उत्क्रांत होते, बदलते हे आपण लक्षात घेतले पाहिजे. अंतिम किंवा पाषाणात खोदून ठेवलेले असे कोणतेही सत्य नसते. अगदी नास्तिक माणूस झाला तरी तो प्रेमाच्या व परोपकाराच्या कृत्यातून देवाच्या अस्तित्वाला मान्यता देतच असतो. आपल्या चांगल्या वर्तणुकीतून तो स्वतःच्या आत्म्याची मुक्ती साधतो व त्याचबरोबर मानवतेच्या मुक्तीच्या प्रक्रियेत सक्रिय सहभागी होतो.”

*"बायबल  हा अतिशय सुंदर ग्रंथ आहे, पण इतर सर्व महान प्राचीन ग्रंथांप्रमाणे त्यातील काही भाग कालबाह्य झाला आहे. त्यातील काही भाग तर असहिष्णुतेला  किंवा इतरांचा न्यायनिवाडा करण्यास प्रोत्साहन देतो. हा भाग बायबलमध्ये मागून घुसडण्यात आला आहे हे जाहीर करण्याची वेळ आली आहे. कारण संपूर्ण ग्रंथातून जो प्रेमाचा व सत्याचा संदेश प्रक्षेपित होतो, त्याच्याशी तो पूर्णपणे विसंगत किंवा विरोधी आहे. आम्हाला जे भान आले आहे, त्यानुसार आम्ही  लौकरच स्त्रियांना धर्मोपदेशकाच्या विविध पदांवर- कार्डिनल, बिशप, प्रीस्ट – नियुक्त करू. मला अशा वाटते की भविष्यात पोपचे पदही स्त्री भूषवू शकेल. पुरुषांसाठी उघडा असणारा कोणताही दरवाजा स्त्रियांसाठी बंद राहता कामा नये."*

कॅथॉलिक पंथात इतके आमूलाग्र परिवर्तन इतक्या कमी काळात घडवून आणण्याची प्रेरणा पोप फ्रान्सिस ह्यांना कोठून मिळाली? त्यांनी सुचविलेले बदल किती काळ टिकून राहतील? बहुराष्ट्रीय कंपन्या, डोनाल्ड ट्रंपसारखे राजकीय नेते, चर्चमधील पुराणमतवादी ह्या सर्वांच्या एकत्रित विरोधाला व चर्चमधील अंतर्गत राजकारणाला ते किती काळ तोंड देऊ शकतील? असे अनेक प्रश्न सध्या तरी अनुत्तरित आहेत. मला ह्या लेखमालेतून फक्त येवढेच सूचित करावयाचे आहे की कालबाह्य धार्मिक कर्मकांड, अंधश्रद्धा  ह्यांविरुद्धचा विवेकवादाचा लढा केवळ निरीश्वरवादी /नास्तिक ह्यांच्या विचार-आचारांतूनच साकार होतो, असे नसून प्रत्येक धर्मात परंपरांचा  व नवतेचा हा संघर्ष अविरत सुरूच असतो. ही लढाई कधीच निर्णायक स्वरूपाची नसते, म्हणून विवेकाची ज्योत तेवत ठेवण्याचे काम प्रत्येक पिढीला प्रत्येक पातळीवर – देवघरात, रीतीरिवाज स्वीकारण्यात किंवा नाकारण्यात, कुटुंबात, समाजात, न्यायालयीन लढाईत -  करावेच लागते.

सरतेशेवटी आपल्या सर्वांना पडायला हवा असा एकच प्रश्न –

विसाव्या शतकात तत्त्वज्ञान व आचार ह्या दोन्ही पातळ्यांवर स्वतःमध्ये प्रचंड बदल घडवून काळाच्या व विज्ञानाच्या प्रवाहाशी सुसंगत राहिलेला हिंदुधर्म आज त्या तुलनेत कोठे आहे? विवेकानंदांसारख्या बंडखोर संन्याशाला आम्ही आज 'हिंदुत्ववादी' बनवून टाकले आहे. अशा  वेळी जागतिकीकरणाची आह्वाने पेलू शकेल, अशा विज्ञानाभिमुख नूतन हिंदू धर्माच्या उदयासाठी हिंदू धर्माला एखाद्या पोप फ्रान्सिसची गरज आहे का?

ईमेल: ravindrarp@gmail.com

# जनुकांतरित (जीएमओ) पिकांच्या विरोधात युरोपातील जनमत

***डॉ. तारक काटे***

बियाणे, जनुकबदल, बीटी, यूरोप, मोन्टॅन्सो

---

जनुकीय संस्कारित पिके म्हणजे तंत्रज्ञानाचे पुढचे पाऊल. त्याला विरोध म्हणजे विज्ञान-तंत्रज्ञान –विकास ह्या सर्वांना विरोध, असे अनेक माध्यमांतून वारंवार सांगितले जाते. युरोपमधील ग्राहक, शेतकरी व शास्त्रज्ञ मात्र प्राणपणाने ह्या तंत्रज्ञानाला विरोध करीत आहेत. त्या विरोधाची मीमांसा करणारा हा लेख मोन्सॅन्टोसाठी महाप्रचंड 'सीड हब' उभारण्याच्या महाराष्ट्र सरकारच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर नक्कीच महत्त्वाचा आहे.

---

युरोपातील व त्यातही पश्चिम युरोपातील देशांमध्ये राहणाऱ्या बहुसंख्य लोकांचे मत जनुकीय संस्कारित पिकांच्या लागवडीच्या व अशा पिकांपासून निर्मिल्या जाणाऱ्या खाद्यपदार्थांच्या सेवनाच्या विरोधात आहे. याला काही ऐतिहासिक कारणे आहेत.

दुसऱ्या महायुद्धापर्यंतच्या काळात येथील कारखान्यांमध्ये रासायनिक प्रक्रियांद्वारा तयार होणाऱ्या नत्राचा उपयोग युद्धासाठी लागणाऱ्या स्फोटकांच्या निर्मितीसाठी होत होता. दुसरे महायुद्ध संपल्यानंतर या नत्राचा काय उपयोग करावा असा प्रश्न निर्माण झाला. यातून या नत्राचा उपयोग शेतीसाठी नत्रपुरवठा करण्यासाठी होऊ शकतो हे लक्षात आल्यावर युरोपात व इतरही विकसित देशांमध्ये रासायनिक शेतीची मोठ्या प्रमाणात सुरुवात झाली आणि विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात तिचा येथे सर्वदूर प्रसार झाला. याच काळात येथील शेतीचे यांत्रिकीकरण झाले, नवनव्या तंत्रज्ञानाचा वापर खूप प्रमाणात वाढला व या शेतीचे एक प्रकारे औद्योगिकीकरण झाले. शेतीच्या या स्वरूपालाच आपण

'औद्योगिक शेती' (इंडस्ट्रीयल ॲग्रिकल्चर) असे म्हणतो. मात्र या शेतीचे जे विपरीत परिणाम मनुष्यांवर व इतर प्राणिमात्रांवर तसेच पर्यावरणावर झाले त्याची झळदेखील इथल्याच लोकांना आधी सोसावी लागली. साठच्या दशकात राचेल कार्सन यांचे 'सायलेंट स्प्रिंग' हे पुस्तक अमेरिकेत प्रकाशित झाल्यानंतर सर्व जगभर रसायनांच्या पर्यावरणावरील दुष्परिणामांच्या विरोधात खळबळ माजली. युरोपातील बहुसंख्य लोक आपल्या हक्कांविषयी जागरूक असल्यामुळे येथील जनमत या परिणामांविषयी जागरूक होऊ लागले. ऐंशी व नव्वदच्या दशकांत एचआयव्हीच्या संदर्भात रक्तदूषीकरण, मॅड काऊ डीसीज, ॲस्बेस्टॉसच्या वापरामुळे होणारा फुफ्फुसाचा कर्करोग या विषयांच्या संदर्भात संबंधित कंपन्यांनी व शासकीय यंत्रणेने प्रथम माहितीची जी लपवालपवी केली आणि त्यानंतर केवळ आर्थिक व राजकीय लाभांचाच विचार करून लोकांच्या आरोग्याला धोका पोचणाऱ्या प्रश्नाकडे ज्या बेफिकीरपणे दुर्लक्ष केले त्यामुळे येथील लोक एकंदरीतच अशा बड्या कंपन्या व त्या प्रसारित करीत असलेल्या नव्या तंत्रज्ञानाविषयी साशंक झाले.

जनुकीय संस्कारित पिकांच्या मुद्दा युरोपात १९९६ साली प्रथम मोठ्या प्रमाणावर चर्चेला आला जेव्हा अशा काही प्रगत तंत्रज्ञानावरचा व त्यांचा प्रसार करणाऱ्या संस्था व कंपन्या यांच्यावरचा लोकांचा विश्वास उडत चाललेला होता. एकूणच औद्योगिक शेतीमुळे झालेले प्रदूषण व या प्रकारच्या शेतीव्यवस्थेमुळे निर्माण होणाऱ्या अन्नाची घसरलेली गुणवत्ता हे लोकांच्या काळजीचे विषय होते. त्यामुळे जनुकीय संस्कारित पिकांच्या लागवडीतून होणाऱ्या तथाकथित फायद्यापेक्षा अशा प्रकारच्या अन्नाच्या सुरक्षेविषयीचे धोके व तंत्रज्ञानाचे पर्यावरणावर होऊ घातलेले अनिश्चित व अपरिवर्तनीय परिणाम हे येथील सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने काळजीचे विषय असल्यामुळे त्यांचे या तंत्रज्ञानाच्या बाबतीत प्रतिकूल मत झाले. त्यात पर्यावरणाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था, माध्यमे, नागरिक संघ, लोकचळवळी यांच्या द्वारा सामाजिक व्यासपीठावर या विषयावर सतत चर्चा होत राहिली, त्यामुळेही लोक जागरूक झाले. लोकांना असे वाटते की औद्योगिक शेतीमुळे प्रदूषण वाढले, अन्नाचे

पोषणमूल्य कमी झाले, शेती परवडण्यासारखी न राहिल्यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांना शेती सोडावी लागली आणि त्यामुळे जनुकीय संस्कारित पिकांचे हे नवे तंत्रज्ञान अशाच प्रकारच्या अहितकारक शेतीपद्धतीला बळकटी देणारे आहे.

२००८ मध्ये जर्मनीमध्ये 'जीएमओ' या विषयावर मोठा वाद-प्रतिवाद झाला. त्यात तेथील पर्यावरण तज्ज्ञांच्या परिषदेने 'तळ्यात व मळ्यात' न करता ठाम भूमिका घेतली. त्यांची मांडणी अशी होती की 'जीएम' पिकांमुळे होणारे निसर्गातील इतर वनस्पतींचे प्रदूषण संपूर्णपणे टाळता येणे केवळ अशक्य आहे. अशा पिकांचे तसेच या अनुषंगाने शेतीपद्धतीत जे बदल होतील त्यांचे संभाव्य परिणाम अत्यंत धोक्याचे व दूरगामी असतील. उभ्या आणि आडव्या जनुक स्थानांतराच्या (व्हर्टिकल व हॉरिझॉन्टल जीन ट्रान्सफर) शक्यतेमुळे गैरजीएम पिकांसाठी, परागसिंचनात महत्त्वाची बजावणाऱ्या मधमाश्यांसारख्या उपयुक्त कीटकांसाठी तसेच शेतीक्षेत्राशिवाय निसर्गात इतरत्र वाढणाऱ्या वनस्पती आणि त्यांवर जगणाऱ्या सजीवांसाठी हे बदल विपरीत परिणाम करणारे असतील.

त्यातच २०१० साली फ्रान्समधील एक अभ्यासू दिग्दर्शिका मारी-मोनिक रोबिन यांचा 'द वर्ल्ड ऑफ मोन्सॅन्टो' या शीर्षकाचा वृत्तचित्रपट प्रसारात आला. त्यात दिग्दर्शिकेने सर्व जगभर हिंडून जिथे जिथे मोन्सॅन्टोचे जनुकीय अभियांत्रिकी तंत्रज्ञान पोचले आहे अशा ठिकाणी जाऊन तेथील अशा पिकांची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या, शास्त्रज्ञांच्या, पर्यावरणतज्ज्ञांच्या, शासकीय अधिकाऱ्यांच्या, मोन्सॅन्टो कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या आणि सामान्य नागरिकांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन या तंत्रज्ञानाच्या परिणामांचे, कंपनीच्या लबाडीचे, शासकीय अधिकाऱ्यांच्या व राजकारण्यांच्या कंपनीशी असलेल्या साटयालोटयाचे प्रत्ययकारी चित्रण केले होते. जवळपास पावणेदोन तासांच्या या चित्रपटातून या पिकांमुळे होणाऱ्या सामाजिक-आर्थिक व पर्यावरणीय परिणामांचे भीषण स्वरूप समोर येते. यात भारतातील कापूस लागवड करणाऱ्या शेती शेतकऱ्यांचीही दुरवस्था चित्रित करण्यात आली होती (त्यासाठी यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा तालुक्यात बीटी कापसाच्या लागवडीमुळे आत्महत्या-ग्रस्त शेतकरी झालेल्या शेतकरी कुटुंबांचे चित्रण करण्याच्या कामात मदत

करण्यासाठी मी या चमूसोबत गेलो होतो. त्या दोन दिवसांच्या अल्प वास्तव्यात आम्हाला दोन शेतकऱ्यांची आत्महत्या झालेली पाहवयास मिळाली. अशा घरातील कुटुंबीयांशी चर्चा करताना घराचा कर्ता माणूस गेल्यानंतर त्यांची झालेली वाताहत आठवून मन आजही सुन्न होते). या वृत्तपटाचा अनुवाद युरोपातील बहुतांश भाषांमधून झाला व हा वृत्तपट दूरचित्रवाणीच्या माध्यमातून युरोपात सर्वत्र दाखविण्यात आला. याशिवाय सेंद्रिय शेतीविषयी, अन्नसुरक्षेविषयी तसेच पर्यावरणरक्षणाविषयी काम करणाऱ्या संस्थांनी त्याचे जागोजागी खाजगी प्रदर्शन केले. या वृत्तपटाने जनमत मोन्सॅन्टोच्या विरोधात जाण्यात मोठाच हातभार लावला.

या पार्श्वभूमीवर २८ देशांचा समावेश असलेल्या युरोपीयन महासंघाने (युरोपीयन युनिअन) काही महत्त्वाची पावले उचलली. २०१० साली युरोपात बाहेरून आयात होणाऱ्या अन्नाच्या सुरक्षितेच्या दृष्टीने 'युरोपीयन अन्नसुरक्षा प्राधिकरणाद्वारे' वैज्ञानिक पद्धतीने मूल्यांकन करण्याचा कायदा करण्यात आला जेणेकरून हे आयातित अन्न मानव, प्राणी व पर्यावरण यांसाठी धोकादायक ठरणार नाही याची खातरजमा करता येईल. युरोपात गुरांच्या खाद्यपदार्थांचे दुर्भिक्ष्य असल्यामुळे वरील नियम काटेकोर पद्धतीने पाळून वर्षाला जवळपास ३ कोटी टन गुरांसाठीच्या 'जीएमओ' निर्मित' खाद्याची आयात केली जाते. तसेच ज्या अन्नपदार्थांमध्ये 'जीएमओ' निर्मित खाद्यपदार्थांचे प्रमाण ०.९ % च्या वर असेल त्यावर 'लेबलिंग' करणे बंधनकारक करण्यात आले. ज्यामुळे असे पदार्थ खावेत की नाही याचा निर्णय ग्राहकाला घेता येणे सोईचे होईल. या योजनेनुसार २०१४ सालापर्यंत कापूस, मका, तेलबियाणे, सोयाबीन, बीट या पिकांच्या ४९ जातीच्या 'जीएमओ' प्रकारच्या शेती-उत्पादनांना परवानगी देण्यात आली तरी युरोपियन महासंघाने योग्य तपासणी करून मंजुरी दिलेले असे 'जीएमओ' निर्मित पदार्थ आपल्या देशात येऊ द्यायचे की नाही तसेच अशा पिकांची आपल्या देशात लागवड करायची की नाही या संदर्भात आपापल्या देशातील वास्तवाशी सुसंगत नियम व कायदे करण्याचे स्वातंत्र्य महासंघातील सहभागी देशांना देण्यात आले.

आताच्या घडीला स्पेन हा युरोपातील एकमेव देश असा आहे की जिथे १,३७,००० हेक्टर क्षेत्रावर बीटी मक्याची लागवड केली जाते जी युरोपातील एकूण 'जीएम' पिकांखाली असलेल्या क्षेत्राच्या ९० % आहे; इतर १०% क्षेत्र हे झेक गणतंत्र, स्लोव्हानिया, पोर्तुगाल, रोमानिया व पोलंड या देशांमध्ये सामावले आहे. मात्र फ्रांन्स व जर्मनी हे देश जनुकीय संस्कारित पिकांचे कट्टर विरोधक आहेत. त्या खालोखाल ग्रीस, ऑस्ट्रिया, हंगेरी, लुक्स्झेन्बर्ग, बुल्गारिया या देशांचा क्रमांक लागतो. सध्या युरोपातील जवळपास निम्म्यापेक्षा जास्त देश जनुकीय संस्कारित पिकांच्या लागवडीच्या विरोधात आहेत व लोकमानस लक्षात घेऊन त्यांनी आपापल्या देशात या तंत्रज्ञानाविरोधात कडक कायदे केले आहेत. फ्रान्समध्ये तर तेथील शेतकरी-संघटनाही या तंत्रज्ञानाच्या कट्टर विरोधात आहे. जर्मनीमध्ये ग्राहकांचा या तंत्रज्ञानाला असलेला विरोध पाहून येथील शेतकरी-संघटनेने आपल्या शेतकरी-सदस्यांना अशी पिकांची लागवड न करण्याचा सल्ला दिला आहे. जर्मनीत जनुकीय संस्कारित पिकांच्या लागवडीच्या संदर्भातील कायदे एवढे कडक आहेत की संशोधनासाठी अथवा प्रायोगिक तत्त्वावर म्हणूनदेखील खाजगी अथवा शासकीय यंत्रणेद्वारा अशा पिकांची लागवड केली गेल्यास जर या लागवडीखालील क्षेत्रातून परिसरातील इतर शेतकऱ्यांच्या पिकांमध्ये 'जीएमओ' प्रदूषण आढळून आले अथवा या पिकांपासून तयार झालेल्या अन्नपदार्थांमध्ये देखील 'जीएमओचे' अंश आढळले तर जवळपास ८५ दशलक्ष युरो इतका दंड अशा यंत्रणेला होऊ शकतो. अशा स्थितीत या शेजारच्या शेतातील पीक किंवा त्यापासून तयार केलेले अन्नपदार्थ नष्ट केले जातील व त्याची भरपाई ज्यांच्यामुळे हे नुकसान झाले त्यांच्याकडून वसूल केली जाईल. या धाकापोटी नियमबाह्य लागवड हा प्रकार इथे नाही (याच्या अगदी विपरीत परिस्थिती अमेरिकेत आहे. काही वर्षांपूर्वी तिथे मोन्सॅन्टोने विकसित केलेल्या जीएम बियाण्यापासूनचे पीक ज्या शेतकऱ्याने लावले होते त्याचे काही अंश शेजारील शेतकऱ्याच्या शेतातील पिकात आढळून आल्यामुळे मोन्सॅन्टोने त्या शेजारील शेतकऱ्यांविरुद्ध पेटंट कायद्याचा भंग झाल्याबद्दल दावा ठोकला व न्यायालयाने तो मान्य केल्यामुळे त्या शेजारच्या शेतकऱ्याला काही दशलक्ष

डॉलर्सचा दंड भरावा.

सुदैवाने युरोपातील सरकारे अजून तरी अमेरिकेप्रमाणे बहुराष्ट्रीय कंपन्यांची बटीक बनलेली नाहीत. येथील राजकीय पक्षांना जनमानसाच्या रेट्याची दाखल घ्यावी लागते व राज्यकर्त्यांना त्याप्रमाणे निर्णय घ्यावे लागतात. यामुळेच जवळपास १४ वर्षे सरकार दरबारी मोठ्या प्रमाणावर 'लॉबिंग' करूनही पश्चिम युरोपातील देशांमधील जनतेच्या विरोधी रेट्यापुढे हतबल होऊन २०१३ मध्ये मोन्सॅन्टोला जर्मनी व इतर काही युरोपीय देशांतून आपल्या 'जीएम' पिकांच्या प्रसाराची मोहीम कायमची आवरावी लागली. यावरून 'जीएम' पिकांना येथील जनतेचा व शासनकर्त्यांचा विरोध किती प्रखर आहे हे लक्षात येते.

जर्मनीत 'जीएम' पिकांची लागवड होत नसली तरी शेतकरी आपल्या शेतात मोन्सॅन्टोची रासायनिक कीटकनाशके व तृणनाशके यांचा वापर करतात, त्यामुळे बाळाला स्तनपान देणाऱ्या मातांच्या दुधात आणि सामान्य माणसांच्या लघवीतदेखील यांचे अंश आढळल्यामुळे मोन्सॅन्टोच्या विरोधात प्रचंड रोष आहे. त्यामुळेच २०१३ पासून तसेच मागील वर्षी मोन्सॅन्टो विरोधात जागतिक मोर्चाचा भाग म्हणून बर्लिन येथे आयोजिलेल्या मोर्चात हजारोंच्या संख्येने लोक सामील झाले.

सामाजिक व पर्यावरणाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा असा आरोप आहे की कृषीनिविष्टांचा व्यापार करणाऱ्या बड्या बहुराष्ट्रीय कंपन्याच्या विषाक्त रसायनांमुळे लोकांचे आरोग्य, जलपुरवठा, परागीकरणाद्वारे पिकांच्या उत्पादनात महत्त्वाची भूमिका बजावणारे उपयोगी कीटक व एकूणच पर्यावरण यावर घातक परिणाम झाले आहेत. मोन्सॅन्टोसारख्या कंपन्या अन्नसुरक्षाविषयक नियंत्रण व्यवस्था तसेच 'जीएम' पिकांचे लेबलिंग या सारख्या सामान्य नागरिकांच्या हिताच्या गोष्टींनाही विरोध करीत असल्यामुळे लोकांचा या कंपन्यांवर राग आहे. तसेच मोन्सॅन्टोने बियाण्यांवर जवळपास एकाधिकार गाजविल्यामुळे लहान शेतकऱ्यांचे बीजस्वातंत्र्य धोक्यात आले आहे. मोन्सॅन्टोने अमेरिकेत आपले राजकीय वजन वापरून बराच काळ सबसिडीचा फायदा उपटला. इतक्यातच अमेरिकन पार्लमेंटमध्ये अमेरिकन काँग्रेस व राष्ट्राध्यक्ष यांनी

मिळून एक असा कायदा संमत केला आहे की ज्यामुळे तेथील न्यायव्यवस्था कोणत्याही कारणामुळे मोन्सॅन्टोला त्यांच्या 'जीएमओ' बियाण्यांची विक्री करण्यापासून रोखू शकणार नाही. यावरून मोन्सॅन्टोचे हात कुठवर पोचले आहेत हे लक्षात येते. या अशा धोरणांमुळे लहान शेतकरी व सेंद्रिय शेती करणारे शेतकरी यांचा तोटा होतो. मात्र मोन्सॅन्टोसारखी बहुराष्ट्रीय कंपनी बियाणांच्या पेटंट्सवर व जनुकीय संपदेवर भल्याबुऱ्या मार्गाने एकाधिकारशाही गाजवून आपला खोऱ्याने नफा कमावण्याचा मार्ग मुक्त ठेवते.

**शाईनफेल्ड, जर्मनी**
vernal.tarak@gmail.com

## पत्रकारांसाठी भारत सर्वाधिक असुरक्षित

'रिपोर्टर्स विदाउट बॉर्डर्स' ही माध्यमांच्या क्षेत्रात जागल्याची (watchdog) भूमिका वठविणारी एक आंतरराष्ट्रीय संघटना आहे. जगभरात पत्रकार आपला जीव धोक्यात घालून सार्वजनिक हिताच्या अनेक गोष्टींना वाचा फोडत असतात. असे करताना त्यांना हितसंबंधीयांकडून धमक्या, त्रास, हल्ले, blackmailing इ. बाबींना सामोरे जावे लागते. अनेकदा त्यांचे खूनही होतात. ही संघटना अशा घटनांचे संकलन करून त्याविरोधात आवाज उठविण्याचे कार्य करते. ह्या संघटनेच्या एका अहवालानुसार 'जनसंपर्क माध्यमात काम करणाऱ्या व्यक्तींसाठी भारत हा आशियातील सर्वांत असुरक्षित देश आहे. पाकिस्तान व अफगाणिस्थान ह्या देशांची स्थिती ह्या बाबतीत आपल्यापेक्षा बरी आहे. जागतिक क्रमवारीत आपण तिसऱ्या स्थानावर आहोत. आपल्याहून वर फक्त इराक व सीरिया हे दोन युद्धग्रस्त देश आहेत.

# मूठभर माती

*अरविंद गुप्ता*

शालेय विज्ञान, आयआयटी, उच्च शिक्षण

---------------------------------------------------------------------------

आयआयटी म्हणजे अमेरिकेतील बहुराष्ट्रीय कंपन्यांना तंत्रज्ञ-व्यवस्थापक पुरविणाऱ्या शिक्षणसंस्था हे गृहितक तितकेसे बरोबर नाही. आयआयटीच्या खुल्या वातावरणातून स्वतंत्र विचार करण्यास शिकलेल्या व गरीब वंचित मुलांना विज्ञान शिकविण्यासाठी आपले आयुष्य वेचणाऱ्या एका सच्च्या वैज्ञानिकाची जडणघडण व कार्य उलगडून दाखविणारे हे प्रांजळ आत्मकथन ...

---------------------------------------------------------------------------

"आणि कुठेतरी असे अभियंते आहेत,
जे इतरांना ध्वनीहून अधिक वेगाने उडायला मदत करतात.
पण जमिनीवर राहणे भाग असणाऱ्यांना साह्य करणारे
अभियंते कुठे आहेत?"

(*ऑक्सफॅम* संस्थेचे एक पोस्टर)

माझे आईवडील कधी शाळेत गेले नाहीत. माझ्या वडिलांचा छोटासा व्यवसाय होता आणि ते कायम कर्जात बुडालेले असत. माझी आई त्यांच्या धंद्यातील अडचणी ऐकून त्यांना योग्य सल्ला देई, जो त्यांनी कधीच मानला नाही. पण तिच्या शहाणपणाचा मला खूप फायदा झाला. तिच्यामुळे मला प्रचंड आत्मविश्वास मिळाला व स्वतःचे मोल ओळखण्यास मी तिच्यामुळे शिकलो.

माझी आई एका उच्चशिक्षित कुटुंबातून आली होती. तिच्या सर्वात मोठ्या भावाने पन्नासच्या दशकात स्वित्झर्लंडमधून अभियांत्रिकीचे शिक्षण घेतले होते. धाकटा भाऊ रॉकफेलर स्कॉलरशिप मिळवून उत्तर भारतातील पहिला पुरुष स्त्रीरोगतज्ज्ञ म्हणून प्रसिद्धी पावला होता. आग्रा मेडिकल कॉलेजातील तिन्ही सन्मान पटलांवर – सन्मान्य विद्यार्थी, सन्मान्य शिक्षक व सन्मान्य प्राचार्य-

त्याचे नाव कोरलेले आहे.

माझ्या आईला शिक्षणाचे मोल माहीत असल्यामुळे आम्हा सर्व भावंडांना तिने बरेली (उ. प्र.) येथील सर्वोत्कृष्ट इंग्लिश कॉन्व्हेंटमध्ये टाकले. आम्हाला उत्तम शिक्षण मिळावे ह्याविषयी ती इतकी आग्रही होती की कर्जाचा बोजा वाढला तसे तिने आपले सर्व दागिने एकेक करत विकले, पण आमच्या अभ्यासात खंड पडू दिला नाही. मी अभ्यासात चांगली प्रगती केली व इंटरमीजिएटच्या परीक्षेत मी जिल्ह्यात पहिला आलो. बारावीनंतर मी आय आय टीची प्रवेश परीक्षा दिली व त्यात भारतात २१८वा (व उत्तर विभागात २८वा) क्रमांक मिळवून मी आय आय टी कानपूरमध्ये दाखल झालो. कोणत्या शाखेत प्रवेश घ्यावा ह्याबद्दल मला काहीएक कल्पना नव्हती. म्हणून मी माझ्याआधीच्या २७ विद्यार्थ्यांना त्याबद्दल विचारले. त्या सर्वांनी विद्युत-अभियांत्रिकीची निवड केली होती. अशा रीतीने ह्या शाखेत माझा प्रवेश झाला.

एका लहान गावातून आलेल्या माझ्यापुढे आय आय टी कानपूरच्या रूपाने माझ्यासाठी जादूची एक नवी दुनियाच उघडली. तिथल्या सुसज्ज इमारती, अचंबित करणाऱ्या सुविधा, ज्ञानी व सजग प्राध्यापक व उच्चभ्रू मित्रगण ह्यांमुळे मला कधी कधी त्या सर्व गोष्टींबद्दल भीतियुक्त आदर वाटे आणि त्यापासून एक विलगतेची भावनाही निर्माण होई. पण त्यामुळे शिकण्याच्या अनेक नव्या संधी मला प्राप्त झाल्या. एकदा फिरायला गेल्यावर अखिलेश अग्रवाल ह्या माझ्या मित्राने पूर्ण तीन तास भाषण ऐकवून भारत-चीन युद्धाच्या असंख्य पैलूंशी माझा परिचय करून दिला. त्याचे ह्या विषयातील ज्ञान पाहून मी तर भारावून गेलो. आय आय टीत येण्यापूर्वी अखिलेशने ह्या विषयावरील सातही पुस्तके वाचली होती! अखिलेश हा कसबी बोटांचा माणूस होता. आम्ही दोघांनी मिळून त्या काळात बरेच उपद्व्याप केले- कॉम्प्रेस्ड एअर इंजिन किंवा वॅंकल इंजिन बनविणे, एरोमॉडेलिंगचे इंजिन दुरुस्त करणे इ. आम्ही दोघांनी मिळून मोजून तीन वर्षे आय आय टीत एरो मॉडेलिंग व ऑटो क्लब चालविला. लहानपणी मी फारसे वाचन केले नव्हते. आमच्या घरी वाचायला फारशी पुस्तके नव्हती. त्या काळात मी वाचलेले पुस्तक म्हणजे मॅक्सिम गॉर्कीची ‘आई’ ही कादंबरी. ती वाचून मी खूप रडलो होतो.

आय आय टी कानपूरमधील सर्वात सुंदर गोष्ट म्हणजे तिथले वाचनालय ! ते सकाळी ८ पासून मध्यरात्रीपर्यंत उघडे असे आणि आम्हाला

त्यातून एका वेळी दहा पुस्तके घेता येत. मी तिथे भरपूर वाचन केले . मी रोज ६ वृत्तपत्रे वाचत असे. तिथे मला इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकली (ईपीडब्ल्यु) वाचण्याचे व्यसन लागले. त्यातील अशोक मित्रांचे 'Calcutta Diary' हे सदर तर माझ्या भलत्याच आवडीचे. त्यामुळे मला माझे अनुभव वेगळ्या दृष्टीकोनातून पाहण्यास मदत मिळाली. आय आय टी च्या पाचही वर्षी मला मेरिट-कम-मीन्स शिष्यवृत्ती मिळाली. त्यामुळे, माझ्या आईवडिलांना मला घरी ठेवण्यापेक्षा आय आय टीत धाडणे अधिक स्वस्त पडले!

१९७०चे दशक राजकीयदृष्ट्या अतिशय उलाथापालथीचे होते. पॅरिसमध्ये राज्यकर्त्यांना आव्हान देत विद्यार्थी रस्त्यांवर उतरले होते. अमेरिकेत व्हिएतनाम युद्धविरोधी चळवळ तसेच विविध नागरी चळवळी उत्पात घडवीत होत्या. रॅशेल कार्सनच्या 'सायलेंट स्प्रिंग' ह्या पुस्तकाने पर्यावरणवादी चळवळीची मुहूर्तमेढ रोवली होती. युद्धविषयक संशोधनात सहभागी न होण्याची शपथ बुद्धिजीवी घेत होते.

वातावरणात क्रांतीचा सुगंध होता. साचलेल्या समाजात 'बहुधा गाळ वर तरंगतो', पण राजकीय घुसळण होते, तेव्हा मोठ्या प्रमाणावर सामाजिक ऊर्जा उत्पन्न होत असते.

मी पहिल्याच वर्षात राजकीय आंदोलनाच्या कामाकडे ओढलो गेलो. माझ्या प्रयोगशाळेतील शिक्षक व्ही जी जाधव ह्यांनी मला सांगितले की संस्थेच्या संचालकांनी प्रिन्स्टन विद्यापीठातून आलेले विख्यात भौतिकशास्त्रज्ञ प्रा. ए पी शुक्ला ह्यांना त्यांच्या कर्मचारी संघातील सहभागामुळे नोकरीतून बडतर्फ केले आहे. त्याविरोधात आवाज उठविण्यासाठी विद्यार्थ्यांनी एका मोर्च्याचे आयोजन केले होते. मी त्यात सहभागी होण्याचे ठरविले. मी बहुधा मोर्च्यातील वयाने सर्वांत लहान विद्यार्थी असेन, बाकीचे बहुतेक सारे एम टेक किंवा पी एच डी करणारे होते. आम्ही एका होस्टेलपासून दुसऱ्यापर्यंत फलक घेऊन मोर्चा काढला. मी अगदी नवखा होता आणि म्हणून मी एकटाच "कॉम्रेड्स, बाहेर या" अशी घोषणा देत होतो. आमच्यातील काही वरिष्ठ विद्यार्थी ती घोषणा ऐकून अस्वस्थ झाले व त्यांनी मला गप्प बसविले. माझ्या दृष्टीने 'कॉम्रेड' शब्दाचा अर्थ मित्र, साथीदार एव्हढाच होता, त्यामुळे त्यांचे वागणे मला कळू शकले नाही. आम्ही मोर्च्याचा शेवट संचालकांच्या घरासमोर लघुशंका करून केला. ही बहुधा माझी पहिली राजकीय कृती असावी!

आय आय टी कानपूरमधील काही बुद्धिवंतांना नक्षलवादी आंदोलनाबद्दल सहानुभूती होती. अनेक कप चहा पीत व अनेक चारमिनार सिगारेट्स ओढत ते 'वर्ग संघर्ष' आणि 'राज्यशक्ती हिसकावण्या'बद्दल अखंड चर्चा करीत. तशा पोकळ गप्पा मला कधी आकर्षित करू शकल्या नाहीत. मला ते सर्व निरर्थक वाटे. मी म्हणे - "त्याऐवजी ते मेसमधल्या नोकरांसाठी काही काम का करत नाहीत? पहाटेपासून रात्रीपर्यंत ते आपली सेवा करतात तरी त्यांच्या मुलांना केंद्रीय विद्यालय किंवा कॅम्पस स्कूलमध्ये प्रवेश मिळत नाही." आमच्यातल्या काहींना छोटी विधायक कृती करण्यात अधिक रुची होती. म्हणून मी *सहयोग* नावाच्या समूहात सहभागी झालो. आम्ही मेसमध्ये काम करणाऱ्या नोकरांच्या मुलांना शिकविण्याचे काम करीत असू. आम्ही एकेका खोलीवर जाऊन ह्या कामासाठी महिना पाच रुपये वर्गणी जमवीत असू, ज्यायोगे 'एका गरीब मुलाला शाळेत जाता येईल.' काहीजण दयाळू होते व ते मदत करत, काहीजण आमच्या तोंडावर दार आपटून आम्हाला घालवून देत. मी बराच काळ वंचित मुलांसाठी एका टाईप २ क्वार्टरमध्ये चालविलेल्या शाळेत शिकविण्याचे काम केले. त्याला आम्ही 'ऑपॉर्च्युनिटी स्कूल' असे नाव दिले होते.

टी ए- २०४ कोर्सअंतर्गत आम्हाला प्रकल्प करणे आवश्यक होते. आम्ही ठरविले की इतर लोक करतात तसा अखेरीस धूळ खात पडणारा 'मूर्ख' प्रकल्प आम्ही करणार नाही; उलट समुदायाला उपयुक्त ठरेल असेच काहीतरी आम्ही करू. म्हणून, मी व अखिलेश अग्रवालने 'ऑपॉर्च्युनिटी स्कूल'साठी 'सी सॉ' बनविली. शाळेतल्या विद्यार्थ्यांनी श्रमदान करून दोन खड्डे बनविले आणि अखेरीस आम्ही सी सॉ जमिनीत पक्की केली. आम्ही रोज संध्याकाळी ह्या मुलांना गृहपाठ करण्यात मदत करत असू. मी अखेरची तीन वर्षे हॉल ५ मध्ये काढली, जिथे मी नानकारी गावातील डझनभर मुलांना शिकवीत असे. त्या सर्वांनी शालान्त परीक्षा यशस्वीरीत्या पार केली.

१९७०च्या सुमारास डॉ मनमोहन चौधरींनी 'ला मोन्ताज' नावाने फिल्म क्लब सुरु केला. पाच वर्षात आम्ही कुरुसावा, बर्गमन, फेलिनी, डी सिका आणि सत्यजित रे ह्यांचे बहुतेक चित्रपट पाहिले. 'वेजेस ऑफ फिअर' आणि 'द बायसिकल थीफ' आम्ही किमान तीन तीन वेळेस पहिले असतील. आम्ही जगातील सर्वोत्कृष्ट चित्रपट पाहिले आणि देशातील सर्वोत्तम संगीतकारांच्या कलेचा आस्वाद घेतला. त्यांनी आमच्या संवेदनांना खूप प्रभावित केले.

बहिःशाल व्याख्यानमालेअंतर्गत आम्ही डॉ अनिल सद्गोपाल, नोबेलविजेते अर्थतज्ज्ञ गुन्नार मिर्डल आणि हिंदी साहित्यिक भीष्म साहनी अशा दिग्गजाना ऐकले. चांगली संस्था तुमच्या नकळत तुम्हाला प्रभावित करते. तुमच्यावर होणारे संस्कार तुमच्या नकळत तुमच्या त्वचेच्या रंध्रांतून तुमच्या शरीर-मनात प्रवेश करतात , तिथेच ठाण मांडून बसतात.

मला पहिल्या सेमिस्टरला इंग्रजी शिकवायला प्रख्यात विचारवंत-साहित्यिक सुझी तारू ह्या होत्या व 'द लिट्ल प्रिन्स' हे आमचे पाठ्यपुस्तक होते! आम्ही सामाजिक शास्त्रातील अनेक अभ्यासक्रम शिकलो- तत्त्वज्ञान, राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र ह्यांनी आम्हाला कोणत्याही समस्येकडे पाहण्याचे वेगवेगळे दृष्टीकोन पुरविले व एकाच संकुचित 'तांत्रिक' दृष्टीने सर्व प्रश्नांकडे पाहण्यातून आमची सुटका झाली. आय आय टीमुळे आम्हला सर्वंकष दृष्टी मिळाली, ह्यात शंकाच नाही.

त्या दशकाची व्याख्या करणारी घोषणा अशी होती -

"लोकांकडे जा,
त्यांच्यासोबत राहा, त्यांच्यावर प्रेम करा,
ते जे जाणतात, तेथून सुरुवात करा
त्यांच्याजवळ आहे, त्यावर उभारणी करा."

प्रा. डी. बालसुब्रमण्यम ह्यांनी १९७२मध्ये डॉ. अनिल सद्गोपाल ह्यांना मध्य प्रदेशातील खेड्यातल्या मुलांना विज्ञान शिकविण्याचे त्यांचे अनुभव सदर करण्यासाठी आमच्या कॉलेजात आमंत्रित केले. त्यांच्या भाषामुळे मी बराच आंदोलित झालो. १९७५मध्ये मी पुण्यात टेल्को (सध्याची टाटा मोटर्स) येथे प्रशिक्षणार्थी म्हणून रुजू झालो. दोन वर्षांनी मी ह्या निर्णयावर आलो की " मी काही ट्रक बनविण्यासाठी जन्मलो नाही"; म्हणून मी १९७८ मध्ये एक वर्षाची रजा काढली आणि होशंगाबाद विज्ञानशिक्षण कार्यक्रमात काम सुरू केले. तेव्हा गावातील शाळांमध्ये प्रयोगशाळा नव्हत्या व विज्ञान केवळ घोकंपट्टी करून शिकविले जाई. स्थानिक, स्वस्त साधनांचा वापर करून, प्रत्यक्ष कृतीद्वारे विज्ञानशिक्षण रंजक बनविणे हा आमच्या कार्यक्रमाचा उद्देश होता. पहिल्याच महिन्यात मी सायकलची व्हॉल्व ट्यूब व आगपेटीच्या काड्या ह्यांच्या मदतीने

त्रिमिती आकार बनविणारा काडेपेटी मेकॅनो बनविला. त्यातून शालेय विज्ञान ह्या विषयाशी माझे नाते जे जुळले, ते आयुष्यभरासाठी!

कॉलेज जीवनात माझे आदर्श होते लॉरी बेकर! गरिबांच्या आयुष्याला ज्यांनी स्पर्श केला असे ते माझ्या माहितीतील एकमेव जीवित वास्तुविशारद होते. त्यांनी स्थानिक सामग्री व डिझाईन्सचा वापर करून गरीब मच्छिमारांसाठी त्यांना परवडणाऱ्या किंमतीत चांगली घरे बांधली. बेकर हे एक अजब रसायन होते - ते सतत हसत, विनोद करत, व्यंगचित्रे काढत; पण कामाच्या बाबतीत ते अतिशय गंभीर असत. मी ह्या महान माणसासोबत चार महिने काम केले.

मी टेल्कोत फार टिकू शकलो नाही. अनेक प्रश्न माझा पिच्छा पुरवीत असत. उदा.; "सर्वांत जास्त मेहनत करणाऱ्या माणसांना सर्वांत कमी पगार का मिळतो?" म्हणून मी १९८० साली टेल्को सोडली व 'विदुषक कारखान्या'त सामील झालो. दुनु रॉय, सुधींद्र शेषाद्री आणि संजेव घाटगे ह्यांसारख्या संवेदनशील आयआयटीयन्सनी सुरू केलेले हे एक कम्युन होते. इथे आम्ही अतिशय साधे आयुष्य जगत होतो - आम्ही एकत्र जेवणे व जगणे, वर्कशॉप चालविणे, आणि साऱ्या जगातील समस्यांवर चर्चा करून त्यांची चिरफाड करणे हे आमचे आयुष्य होते. "जे जे व्यक्तिगत, ते ते राजकीय" ह्या घोषणेचा अर्थ मला तेव्हा उलगडला आणि माझ्या मनात खोल दडलेल्या प्रश्नांचा मागोवादेखील मला ह्याच काळात घेता आला.

१९८१-८३ ह्या काळात मी छत्तीसगढ येथील खाणकामगारांच्या संघटनेसोबत काम केले. तोपर्यंत 'कंत्राटी कामगार' आणि 'शोषण' हे माझ्यासाठी केवळ पोकळ शब्द होते. त्यांचा आशय जाणून घेण्यासाठी परिघावरील जीवन जगणाऱ्या कामगारांपैकी एक होऊन त्यांच्याचसारखे जगणे आवश्यक आहे असे मला वाटले. माझ्या आयुष्यातील ही तीन वर्षे अतिशय कठीण पण मला समृद्ध करणारी होती. अनेकदा मीठभात हे आमचे जेवण व युनियन ऑफिसची फरशी हा आमचा बिछाना असे. मी 'मितां' (मित्रहो!) नावाचे संघटनेचे मुखपत्र काढीत असे आणि ते खाणींच्या गेटवर विकत असे. त्यासोबतच मी ट्रक दुरुस्तीचे एक गॅरेज चालविण्यात युनियनला मदत करत होतो व त्यांच्या शाळेत शिकवीत होतो. ह्या सर्व गोष्टींतून मला गरिबांच्या आयुष्यातील गहन संघर्षाचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला.

एकोणीसशे चौऱ्यांयशीत मी पुण्याला परतलो. आईवडिलांच्या आकांक्षांचे कोठलेही बंधन नसल्यामुळे मी आपल्या आयुष्याचा मार्ग आखण्यास स्वतंत्र होतो. तेव्हापासून आतापर्यंत मी स्वतःच्या आयुष्यातील श्रेयसाचा पाठपुरावा केला आहे - विज्ञान शिक्षणासाठी स्वस्त साधने बनविणे आणि प्रयोगातून विज्ञान शिकविणारी डझनांनी पुस्तके लिहिणे. 'बिमारू' राज्यातून आलो असल्यामुळे हिंदीत चांगल्या साहित्याची किती कमतरता आहे, हे मला नीट माहित आहे. गेल्या काही वर्षांत मी शिक्षण, शांतता, विज्ञान, गणित आणि बालसाहित्य ह्या विषयांवरील शंभराहून अधिक पुस्तकांचा हिंदीत अनुवाद केला आहे. त्याशिवाय मी 'एन्सीईआरटी'साठी १२० हून अधिक चित्रपट प्रस्तुत केले आहेत, जे अनेकदा दूरदर्शन वरून दाखविण्यात आले आहेत. माझी सर्व पुस्तके आणि वैज्ञानिक खेळणी माझ्या http://arvindguptatoys.com ह्या संकेतस्थळावरून विनामूल्य डाऊनलोड करता येतील.

मला देशभरातील ३०००हून अधिक शाळांमध्ये कार्यशाळा घेण्याचे सौभाग्य लाभले आहे, ज्यांत प्रामुख्याने नगरपालिकांच्या व गरीबांच्या शाळांचा समावेश होता. प्रत्येक कार्यशाळेनंतर मी मुलांच्या चेहऱ्यावर स्मितहास्य व डोळ्यात चमक पाहिली आहे. माझ्यासाठी हे आयुष्यातील सर्वाधिक कृतार्थतेचे क्षण आहेत.

आपल्या देशातील शिक्षणाची भूमी अतिशय प्रतिकूल - जवळजवळ नापीक – आहे. चांगली माती नसेल तर उत्तम बीजही कोमेजून जाते. आपल्या देशातील तरुण मनांची मशागत करण्यासाठी आपल्याकडे खूपच थोडी माती आहे. परिस्थिती कशीही असो, आपल्यातील प्रत्येकाने मुठभर माती 'पिकवली' पाहिजे. इतिहासाने आपल्या खांद्यावर दिलेली ही जबाबदारी आहे आणि उद्याची आशाही त्यातच दडली आहे.

ईमेल: arvindtoys@gmail.com

(इंग्रजीतून अनुवादित)

# ‘हाजी अली सर्वांसाठी’ : एक अनावृत्त पत्र

स्त्रीहक्क, हाजी अली, सुफी पंथ

दि. १३ मे २०१६

प्रति,
विश्वस्त,
हाजी अली दर्गा विश्वस्त मंडळ,
वरळी, मुंबई

**हाजी अली दर्ग्याच्या विश्वस्तांनी ह्या प्रश्नांना उत्तरे दिलीच पाहिजेत.**

महोदय,

सर्वांना आमचा सलाम व शुभेच्छा.

‘हाजी अली सब के लिये’ ह्या आमच्या गटाच्या प्रतिनिधींनी विश्वस्तमंडळ सदस्यांना भेटून हाजी अली साहेबांच्या दर्ग्यात प्रवेश करून त्यांना मजार पर्यंत जाण्याचा स्त्रियांनाही पुरुषांइतकाच हक्क असला पाहिजे ह्या मुद्यावर चर्चा करून त्यावर सर्वमान्य तोडगा काढण्याचा खूप प्रयत्न केला आहे. आमच्या गटाचे सदस्य नसलेले काही शुभेच्छुक मुस्लिमही विश्वस्तांच्या संपर्कात असून त्यांच्याबरोबर बैठक घेण्याची आमची विनंती त्यांनाही मान्य आहे. परंतु दुर्दैवाने गेल्या काही आठवड्यांपासून विश्वस्तांकडून केवळ उडवाउडवीची उत्तरेच मिळत आहेत. त्यामुळे हे खुले पत्र लिहिणे आम्हाला भाग पडले आहे. आम्ही वे वारंवार सांगत आलो आहोत की एखाद्या संताच्या मजारपर्यंत स्त्रियांनी जाण्याचा प्रश्न हा धार्मिक मुद्दा **नसून** केवळ परंपरेचा, रूढीचा भाग आहे आणि तो भारतीय संविधानातील समानतेच्या व लिंगसमन्यायाच्या तत्त्वांवर कुरघोडी करू शकत नाही. (स्त्रियांशी भेदभाव करण्याच्या उद्देशाने अल्पसंख्यकांच्या हक्कांसाठी संविधानात नमूद केलेल्या अनुच्छेद २५ व २६ च्या मागे लपणे म्हणजे त्याच संविधानाच्या अनुच्छेद १५ ची टर उडवणे होय.)

असे असूनही गेल्या काही आठवड्यांपासून विश्वस्तांकडून करण्यात आलेली अनेक विधाने व मुद्रित व इलेक्ट्रॉनी माध्यमांमध्ये आलेल्या त्यांच्या मुलाखती ह्यांच्यामधून त्यांनी हा मुद्दा शरिया किंवा इस्लामी कायद्याचा असल्याचे वारंवार प्रतिपादन केले आहे. ह्या पार्श्वभूमीवर, आमच्या मंचातील (हे एक आंतर-सांप्रदायिक व्यासपीठ आहे) मुस्लिम सदस्य हाजी अली दर्ग्याच्या विश्वस्तांबरोबर महिलांना समान हक्क नाकारण्यात कोणत्या इस्लामी कायद्याचा आधार घेण्यात आला आहे, ह्या प्रश्नावर खुला वादविवाद करू इच्छितात.
विश्वस्तांनी त्यांच्या बाजूने बोलायला येणाऱ्या कोणत्याही दोन मौलानांची किंवा अलीमांची नावे द्यावीत, आम्ही त्यावर आमच्या बाजूने युक्तिवाद करणाऱ्या दोघांची नावे देऊ.

हे सर्व प्रस्ताव सदिच्छेने मांडत असतानाच, मागील अनुभव लक्षात घेता, आम्हाला ट्रस्टींकडून सकारात्मक प्रतिसादाची फारशी आशा नाही, हेदेखील आम्ही खेदाने नमूद करीत आहोत. वर उल्लेख केल्याप्रमाणे त्यांनी आतापर्यंत कसलेच स्पष्टीकरण न देता त्यांचा निर्णय 'इस्लामिक कायद्यानुसार' आहे, एवढेच वारंवार सांगितले आहे. म्हणून आम्ही ह्या पत्रातून आपल्यासमोर काही प्रश्न ठेवत आहोत ज्याद्वारे ह्या प्रश्नांवर अधिक स्पष्टता येऊ शकेल. आम्हाला वाटते, ह्यावरील आपली उत्तरे प्रसिद्ध करण्यात प्रसारमाध्यमांनाही स्वारस्य असेल.

**प्रश्न १.** पुरुषांनी किंवा स्त्रियांनी कोण संताच्या मजारचे दर्शन घेण्याबाबत कुराण काहीच म्हणत नाही. **हो की नाही?**

**प्रश्न २.** स्त्री व पुरुष ह्यांचा समान आध्यात्मिक अधिकार आणि व्यक्तिगत उत्तरदायित्व ह्याबद्दल कुराणाने वारंवार सांगितले आहे, **हो की नाही?**

कुराण म्हणते –

(१) मुस्लिम स्त्री पुरुषांसाठी, विश्वास ठेवणाऱ्या स्त्री-पुरुषांसाठी, धीर धरणाऱ्या आणि सातत्य असणाऱ्या स्त्री- पुरुषांसाठी, नम्रतेचा अंगीकार केलेल्या स्त्री- पुरुषांसाठी, दानधर्म करणाऱ्या स्त्री-पुरुषांनो, उपवास करणाऱ्या स्त्री- पुरुषांसाठी, अव्यभिचारी आणि परमेश्वराची स्तुती करणाऱ्या स्त्री-पुरुषांसाठी -- त्या दोघांसाठी -- परमेश्वराने क्षमा आणि थोर पुरस्कार निर्माण केला आहे. (३३.३५)

(२) हे मानवजाती, आपल्या पोशिंद्याची जाणीव ठेव. एका सजीवातून (नफ) ज्याने तुमची उत्पत्ती केली आणि त्यातूनच त्याचा जोडीदार निर्माण केला आणि ज्यातून अनेकविध मनुष्ये निर्माण होऊन सर्वदूर पसरली (४.१) (येथे किंवा कुराणात अन्यत्र कोठेही हव्वा ही आदमच्या बरगडीपासून निघाली असल्याचा उल्लेख नाही ह्याची कृपया नोंद घ्यावी.)

(३) जे कष्ट करतात, जे माझ्यासाठी कष्ट करतात अशा कोणाकडेही मी दुर्लक्ष करीत नाही, मग ती स्त्री असो वा पुरुष. ते दोघेही एकमेकांना समान आहेत.

**प्रश्न ३**. इस्लामच्या सुरुवातीच्या काळात पैगंबरसाहेबांनी स्त्रिया व पुरुष ह्या दोघांनाही कबरींना भेट देण्यास प्रतिबंध केला असला, तरी नंतरच्या काळात त्यांनी त्या दोघांनाही तसे करण्यास उत्तेजन दिले. **हो की नाही**?

हादित

(१) हजरत आयेशा नेहमीच त्यांच्या भावाच्या कबरीला भेट देत असत . एकदा अब्दुल्ला इब्न अबी मुलैका ह्याने त्यांच्याकडे अशी विचारणा केली की, पैगंबरांनी कबरींना भेट देण्यास मनाई केली होती का? तेव्हा त्या म्हणाल्या, " होय. सुरुवातीच्या दिवसांमध्ये त्यांनी तशी मनाई केली होती. परंतु नंतर त्यांनी आम्हाला तसे करण्याचा आदेश दिला." पैगंबरांच्या अनेक परंपरांमधून ह्या गोष्टीला पुष्टी मिळते. "मी तुम्हाला कबरींना भेट देण्यास मनाई केली होती, परंतु आता मी तुम्हाला त्यांना भेट देण्यास **उत्तेजन** देत आहे." (साहिह मुस्लिम, सुनान अबू दाऊद आणि मुसनाद आहमद, नसाई).

(२) पैगंबर – "पूर्वी मी तुम्हाला कबरींना भेट देण्यास मनाई केली होती. परंतु आतापासून तुम्ही त्यांना भेट देऊ शकता." (मुस्लिम जनैझ, १०६; अदाही३७; अबू दाऊद, जनैझ , ७७; ,...)

**प्रश्न ४.** पैगंबरसाहेबांनी कबरींना भेट देण्यास त्यांच्या अनुयायांना दिलेले उत्तेजन हे इबरतसाठी (भूतकाळावरून धडा शिकणे), तेही एक दिवस मृत्युमुखी पडतील

आणि त्यांच्या कर्मासाठी त्यांना व्यक्तिशः जबाबदार धरले जाईल ह्याची आठवण म्हणून नव्हते काय? **हो की नाही?** इबरत हे फक्त पुरुषांसाठी आहे, स्त्रियांसाठी नाही असे विश्वस्तांचे म्हणणे आहे काय? **हो की नाही?**

ह्याचे उत्तर जर होय असेल, तर विश्वस्तांचे असे मत आहे काय की हजरत आयेशा ह्यांचे त्यांच्या भावाच्या कबरीला भेट देणे इस्लामी कायद्याच्या विरुद्ध होते?

**प्रश्न ५**. हे खरे नाही काय की पैगंबरसाहेबांचे दफन, त्यांची पत्नी हजरत आयेशा जेथे राहात होती त्या घरातील एका खोलीतच करण्यात आले होते आणि त्यानंतर तिचे वडील हजरत अबू बकर (पहिले खलीफा) आणि हजरत उमर (दुसरे खलीफा) ह्या दोघांनाही पैगंबरसाहेबांच्या शेजारीच चिरविश्रांती देण्यात आली. **हो की नाही?**

हे जर खरे असेल तर ही गोष्ट तथाकथित इस्लामी कायद्यानुसार मुस्लिम स्त्रियांनी सत्पुरुष वा संताच्या कबरस्थानाला किंवा मजारला भेट देण्याविषयी किंवा न देण्याविषयी काय सांगते?

**प्रश्न ६**. हे खरे नाही काय की दर वर्षी मक्केला किंवा मदिनेला जाणारे लाखो स्त्रीपुरुष एकाच दर्ग्यात एकमेकांशेजारी बसून प्रार्थना करतात. **हो की नाही?**

जर उत्तर होय असेल तर ते काय इस्लामिक कायद्याचे उल्लंघन म्हणायचे काय?

**प्रश्न७.** हे खरे नाही काय, की ज्या स्त्रिया मदिना येथील पैगंबरसाहेबांच्या, नज्फ मधील हजरत आली (चौथे खलिफा) ह्यांच्या, करबला येथील इमाम हुसैन (पैगंबरसाहेबांचे शहीद झालेले नातू ) ह्यांच्या, सय्यद अब्द अल कादिर अल-जिलानी (घौस –ए-पाक) ह्यांच्या कबरींना भेट देतात (ह्यातील शेवटच्या तीन इराकमध्ये आहेत), त्यांच्यावर पुरुषांइतकीच बंधने किंवा त्यांच्याइतकेच स्वातंत्र्य आहे? ह्याचा अर्थ असा होतो की मुस्लीमांच्या सर्वांत पवित्र स्थळांचे व्यवस्थापन करण्याची ज्यांच्यावर जबाबदारी आहे, त्या व्यक्ती मुस्लीम कायद्यांचे उल्लंघन करीत आहेत; **हो की नाही?**

**प्रश्न ८**. हे खरे नाही काय, की संपूर्ण भारतीय उपखंडातील नसला तरी भारतातील सर्वात श्रद्धेय सूफी संत, ख्वाजा मोइनुद्दीन चिस्ती (गरीब नवाज) ह्यांच्या अजमेर येथील दर्ग्यात लिंगाधारित भेदभाव नाही आणि तेथे स्त्रिया थेट मजारीपर्यंत जाऊ शकतात. **हो की नाही?**

**प्रश्न ९.** स्त्रियांनी हाजी अली दर्ग्यामध्ये का येऊ नये याबाबत विश्वस्तांनी दिलेल्या कारणांमध्ये त्यांच्याच सुरक्षा व सुरक्षिततेसाठी, असे म्हटले आहे. हे खरे नाही काय की मक्का, मदिना, नज्फ, करबला व अजमेर येथील लाखो भाविकांच्या गर्दीच्या तुलनेत हाजी अलीला भेट देणारी गर्दी काहीच नाही.

हे जर खरे असेल तर त्याचा अर्थ असा नव्हे काय की त्याचा इस्लामी कायद्याशी काहीच संबंध नाही? त्यातून जर काही अर्थ निघत असेल तर एवढाच, की हाजी अली दर्ग्यातील गर्दीची व्यवस्था पाहण्यासाठी अधिक कार्यक्षम लोकांची नियुक्ती करण्यासाठी सध्याच्या विश्वस्तांनी तेथून बाहेर पडावे.

**प्रश्न १०.** स्त्रियांनी दर्ग्यात येऊ नये ह्यासाठी विश्वस्तांनी दिलेले आणखी एक कारण असे आहे की स्त्रिया मोठ्या गळ्याची पोलकी घालून येतात व मजारवर झुकल्यावर त्यांची छाती दिसते. 'उनको उनके पल्लूका होश नहीं रहता है.' आता हा शेरा प्रत्यक्ष स्त्रियांपेक्षा, दर्ग्याच्या आतल्या बाजूला भाविकांची व्यवस्था लावण्यास जबाबदार व्यक्तींच्या चंचल नजरेवरच अधिक नाही काय? की त्यांना असे सुचवायचे आहे, की स्त्रिया तेथे येतात त्या त्यांच्या अतीव श्रद्धेय अशा हाजी अली बाबाच्या प्रति असलेल्या भक्तिभावाने येत नसून आपली शरीरे दाखवण्यासाठी येतात?

**प्रश्न ११.** स्त्रियांना त्यांची जागा दाखवून देण्याच्या बाजूचे असलेले काही मुस्लिम लोक हलक्या आवाजात त्या अशुद्ध असताना मजारवर न जाण्याविषयीची चर्चा करीत आहेत. ह्यावर हजरत आयेशा ह्यांचाच एक हादित पाहा – मासिक पाळी सुरू असताना पैगंबरसाहेब माझ्या मांडीवर डोके टेकून कुराणाचे पठण करीत असत. (बुखारी, खंड १, पुस्तक ६ क्र. २९६) ह्यावरून काय ते स्पष्ट होत नाही का? **हो की नाही ?**

बरे, पुरुष जेव्हा दर्ग्यात जातात तेव्हा त्यांच्या शुद्धाशुद्धतेची पारख कोण करते? स्त्रियांनी दर्ग्यात केव्हा जाणे उचित आहे याबाबत त्यांनी पुरुषांकडून धडे घ्यायला हवे आहेत काय?

**प्रश्न १२.** हाजी अली दर्ग्याच्या ७ विश्वस्तांपैकी एकही स्त्री नाही. अशा रीतीने स्त्रियांना तुमच्या विश्वस्तमंडळाचा भाग बनण्यास प्रतिबंध करणाराही काही इस्लामिक कायदा आहे काय? की हे फक्त सरळसरळ कायम चालत आलेल्या पुरुषप्रधानतेचेच द्योतक आहे? हो किंवा नाही ते सांगा.

**प्रश्न १३ .** असेही असू शकते की हे विश्वस्त इस्लामच्या अंतर्गत असलेल्या दोन अगदीच परस्परविरोधी परंपरांची सांगड घालण्यात गुंतले आहेत. एक आहे – सर्वांना सामावून घेणारी, सहिष्णु अशी सूफी परंपरा आणि दुसरी आहे ताठर, अपवर्जक (exclusive), असहिष्णु अशी वहाबी परंपरा. **हो की नाही?**

**प्रश्न १४ .** सैयद लियाकत हुसैन मोइनी हे अजमेरशरीफ येथील दर्ग्याच्या खादिम (कब्जेदार) कुटुंबातील आहेत. त्यांनी टाइम्स ऑफ इंडियातील एका मुलाखतीत असे म्हटले आहे की *"अजमेर येथे भक्तांच्या कोणत्याही गटाच्या विरोधात भेदभाव केला जात नाही कारण सूफी संतांच्या थडग्यांमध्ये नेहमीच सहकारिता, समन्वय व समावेशकता ह्यांना स्थान दिले जाते. म्हणून पवित्र अशा हाजी अली दर्ग्यात जाण्यापासून महिलांना रोकणे योग्य नाही."* म्हणजे दर्ग्यात महिलांना प्रवेश रोकणे सूफीवादाच्या विरुद्ध जाण्यासारखेच आहे. **हो की नाही?**

आता सूफी परंपरेबद्दल बोलायचे तर आम्ही काही नाही तर माजी पाकिस्तानी नोकरशहा अकबर अहमद ह्यांच्या *Journey into Islam* ह्या पुस्तकातील एक अनुभव सांगू शकतो. अमेरिकेतून एक बहुधर्मीय संशोधन गट अजमेर शरीफला भेट देण्यास आला तेव्हाचा हा अनुभव आहे.

*"आम्ही सर्वांनी आमची डोकी कापडांनी झाकली. फ्रँकीला आणि मला डोक्याभोवती गुंडाळायला पागोट्याप्रमाणे भडक गुलाबी रुमाल देण्यात आले होते. हादियाने हिजाब घातल्यामुळे ती आधीच योग्य पेहरावात होती. हेलेनेही पारंपरिक इस्लामी पोशाख करून डोकीस रुमाल बांधला होता. आमचा भारतातील गाइड त्रिविदेश सिंग तर नेहमीच पागोटे घालायचा.*

*दर्ग्याचा प्रतिपालक आणि ख्वाजा मोइनुद्दीन ह्यांचा थेट वारस मुकद्दस मोइनी आमच्याबरोबर होता. त्याने, लाल गुलाब आणि पांढरी फुले ह्यांची वर्तुळाकार रचना केलेली एक पसरट परडी आणून ती हेलेच्या डोक्यावर ठेवण्यास सांगितले. म्हणजे आता ती संताच्या समाधीवर पुष्पाभिषेकाचा विधि करू शकणार होती. हा मोठा मान असल्याचे मला माझ्या मागील भेटीतच मला कळले होते. फारच स्मरणीय क्षण होता तो. एका तरुण ख्रिस्ती स्त्रीला एका मुसलमान संताला मान देण्यासाठी निवडण्यात आले. हे खरे अजमेर मॉडेल!*

*हेलेच्या मागून आम्ही सर्व एका रांगेत दर्ग्याच्या गाभाऱ्यात गेलो. धक्के देत आत जाणाऱ्या गर्दीचाच एक भाग बनलो होतो आम्ही. रांग मोडल्यावरही आम्ही तेथेच प्रार्थना करण्यासाठी शांतपणे बसलो. तेव्हाही मुस्लिम, शीख व ख्रिस्ती असलो, तरी आम्ही तेथील भारावलेल्या आसमंताशी एकरूप होऊन गेलो होतो. तसे पाहिले तर निव्वळ यात्रेकरू होतो आम्ही. परंतु अजमेरच्या त्या दैवी अवकाशाने आम्हाला आपल्यात सामावून घेतले.*

*हेलेसाठी तर डोक्यावर ती परडी धरणे हा अगदी भारावून टाकणाराच अनुभव होता. "मला तिथल्या प्रत्येकाची ऊर्जा व स्पंदने जाणवत होती. माझी ऊर्जा जणू काही अखिल मानवजातीशी जोडली गेली, समाधीवर अभिषेकाच्या लाल गुलाबाच्या पाकळ्यांनी जणू मी आकाशातील तारे आणि समुद्राची पुळण ह्यांच्याशी जोडली गेले. ते थडगे, माझे शरीर, आकाशातील सर्व रंग आणि समुद्राकाठची सारी वाळू तदाकार होऊन एका पोकळीत सामावले. मी वेगळी राहिलेच नाही. मी माझ्या, त्या एकमेव परमेश्वराच्या सान्निध्यात होते." ती म्हणाली.*

तेव्हा, स्त्रिया आणि त्यांचा श्रद्धेय हाजी अली बाबा ह्यांच्यात दरी निर्माण करण्यापेक्षा, स्त्रिया शरीरप्रदर्शन करतात असा कांगावा करण्यापेक्षा, हे विश्वस्तांनो, तुम्ही मजारजवळ असे वातावरण तयार करा, जेथे धर्म आणि संस्कृतीचा संकर होऊन मुमताज, मीरा व मेरी ह्या सर्वांनाच हेलेसारखाच गूढ, भारावलेला अनुभव येईल. **हो की नाही?**

आपले नम्र,

मुमताज शेख, शबाना अन्सारी, मरियम ढवळे, नसरीन कॉन्ट्रॅक्टर, जावेद आनंद, फिरोज मिठीबोरवाला, हसन कमाल, रामदास अब्बास, शहनाज खान, कादेर काझी.

'हाजी अली सगळ्यांसाठी' मंचाच्या सदस्यांच्या वतीने

जावेद आनंद — फिरोज मिठीबोरवाला

९८७०४०२५५६ — ९८२९२७७७५१

**(अनुवाद: अनुराधा मोहनी )**

अनुभव

# लाल सवाल

*उत्पल व. बा.*

नक्षलवाद, विकास, हिंसा-अहिंसा

---------------------------------------------------------------------------

छत्तीसगढमध्ये फिरताना तेथील आदिवासी जीवनाचे दाहक दर्शन लेखकाला झाले. ते जगणे आपल्यासमोर मांडताना हिंसा-अहिंसा, विकास-विस्थापन ह्यांविषयी आपल्या सुरक्षित मध्यमवर्गीय दृष्टीने पाहणे किती अपूर्ण व अन्यायकारी आहे ह्याचे भान जागविणारा व तत्त्वज्ञानाच्या व विचारधारांच्या प्रश्नावर होय- नाहीच्या मधला व्यापक पण अंधुक अवकाश दाखविणारा हा अनुभव.

---------------------------------------------------------------------------

हा प्रदेश आपल्या ओळखीचा नाही. हे रस्ते, दोन्ही बाजूचं जंगल, मधूनच विरळ जंगलात जमिनीवरचं काही वेचणारे लोक, रस्त्यालगतची ही लाल 'शहीद स्मारकं', गस्त घालणारे जवान आणि इथल्या वातावरणात जाणवणारा ताण-- हे सगळं आपल्याला नवीन आहे. आणि का कुणास ठाऊक, पण आपल्याला या वातावरणाचं आकर्षण वाटतंय. अनाकलनीय असं आकर्षण.

आमच्या गाडीचा ड्रायव्हर गाडी थोडी हळू करतो. रस्त्यामध्ये काही पत्रकं दिसतायत. पांढऱ्या कागदावर लाल शाईने काहीतरी लिहिलं आहे. काही हाताने लिहिलेली आहेत, काही छापील. पत्रकांवर एक स्टीलचा डबा ठेवलेला आहे. आम्ही गाडीतून उतरून फोटो काढतो. मागून कुठूनतरी लष्करी स्वरातली दरडावणी ऐकू येते आणि आम्ही मुकाट्याने गाडीत बसून पुढे निघतो.

दंतेवाड्यापासून भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे एक कार्यकर्ता श्रीवास्तव आमच्याबरोबर आहेत. त्यांच्याबरोबर 'पटेलवाडा' नावाच्या एका छोट्या गावात आम्ही जातो. हे अर्थात श्रीवास्तवांमुळेच शक्य होतं. कारण जिथे आमची गाडी थांबते तिथून डावीकडे आत गेल्यावर एखादी छोटीशी का होईना पण लोकवस्ती आहे असं अजिबात लक्षात येत नव्हतं. गावात एका कुटुंबाची भेट होते. राजकुमार भास्कर, लक्ष्मीबाई आणि त्यांची मुलं. झोपडीवजा घर. पण प्रशस्त.

मधल्या मोकळ्या जागेत मोहाची फुलं वाळवण्याचं काम सुरू आहे. क्रिकेटच्या बॅटसारखी एक मोठी लाकडी बॅट घेऊन लक्ष्मीबाई वाळलेल्या फुलांना धोपटत होत्या. या फुलांपासूनच दारू बनते. राजकुमार भास्कर सांगतात की एस्सारच्या खाणीसाठी इथून एक पाइपलाइन टाकायची आहे. त्यात आमची शेतं घेतली जाणार आहेत. आम्ही त्याला स्पष्ट नकार दिला आहे. आता काय होतं ते पाहायचं. त्या घरावर डिश अँटेना आहे. कुठले चॅनल्स बघता, महिन्याला किती पैसे देता असं विचारल्यावर कळतं की गेल्या वर्षी 'कन्यादान' योजनेअंतर्गत सरकारने सगळ्यांना टी.व्ही. आणि ही अँटेना फुकट दिली आहे. त्याचे मासिक चार्जेसही भरायला लागत नाहीत. 'कन्यादान' योजनेखाली टी.व्ही.? ही स्कीम की प्रलोभन? राजकुमार-लक्ष्मीबाईंच्या घरून निघताना एका खोलीच्या बंद दरवाजाकडे लक्ष जातं. तिथे प्रियांका चोप्राचा फोटो लावलेला असतो.

पुढचं गाव धुरली. अतिशय टुमदार खेडं. मधून छोटी वाट. दोन्ही बाजूला छोटी छोटी घरं. इथेही मोहाची फुलं वाळवायचं काम चाललं आहे. घराबाहेर मुलं खेळतायत. श्रीवास्तवना ज्यांना भेटायचंय त्यांच्या घरी जाण्यासाठी वाट वळते आणि अचानक समोर सीआरपीएफचा ताडमाड जवान दिसतो. हातात रायफल. जमिनीवर रोखलेली. चेहरा निर्विकार. पाहताक्षणी आवडलेल्या त्या गावामध्ये आपण जवानाचं चित्र कल्पिलेलं नव्हतं म्हणून आपण एकदम चमकलो हे लक्षात येतं. 'फोटो घेऊ का तुमचा?' असं त्याला खुणेनी विचारल्यावर तो हातानेच नाही म्हणतो. आम्ही पुढे चालू लागतो.

असं लक्षात येतं की गावच्या एका 'पटेल'ला पोलिसांनी चौकशीसाठी नेलं आहे. त्याची बायको आम्हांला गावात भेटते. ती त्यामानाने बरीच शांत आहे. 'ये तो होतेही रहता है' हे तिचं भाष्यही सूचक असतं. मघाशी रस्त्यात दिसलेल्या टिफिन बॉक्सचाही उलगडा इथे होतो. तो डबा टिफिन बॉम्ब असल्याचा संशय होता हे कळतं. इथे आम्ही आवंढा गिळतो, पण तो बॉम्ब नव्हता, भुसा भरलेला टिफिन होता हे तपासाअंती कळलेलं असतं. गावातून बाहेर पडत गाडीकडे जात असताना आजूबाजूने सीआरपीएफचे जवानदेखील रस्त्याकडे चालू लागल्याचं दिसतं. धुरली गावचा सीआरपीएफचा आजचा वेढा उठलेला असतो. 'यहाँ दिन में सीआरपीएफ का राज होता है और रातमें अंदरवालोंका' असं ऐकलेलं असतं. 'अंदरवाले' म्हणजे माओवादी.

दंतेवाड्याहून निघाल्यापासून रस्त्याच्या उजवीकडे बैलाडिला डोंगराची

रांग दिसत होती. आता आम्ही निघालोय ते बचेलीकडे. बैलाडिलाच्या माथ्यावरचे दिवे आता चमकू लागले आहेत. या डोंगरावर एनएमडीसी (नॅशनल मिनरल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन) खाणकाम करते. एनएमडीसी स्थापन झाली १९५८ साली. ही खनिज उत्पादक कंपनी भारत सरकारच्या ताब्यात आहे. कंपनी स्थापनेनंतर लगेच बैलाडिला डोंगरावर लोहखनिजाच्या खाणी सुरू झाल्या. आज छत्तीसगड आणि कर्नाटकमधील आपल्या मालकीच्या ३ खाणींमधून कंपनी सुमारे ३ कोटी टन एवढं अजस्र लोहखनिज बाहेर काढते. हे लोहखनिज जगातील सर्वोत्तम दर्जाचं आहे आणि स्टील निर्माण करण्यासाठी जे गुणधर्म असावे लागतात ते या लोहखनिजात पुरेपूर आहेत.

छत्तीसगड राज्याची निर्मिती झाली २००० साली. राज्यात एकूण सव्वीस जिल्हे आणि नव्वद विधानसभा मतदारसंघ आहेत. लोकसभा मतदारसंघ अकरा. एनएमडीसी वसली आहे तो दंतेवाडा जिल्हा आणि जवळचे बस्तर, बिजापूर, सुकमा हे जिल्हे अतिशय संवेदनशील. माओवाद्यांच्या प्रभावाखाली असलेले. इथे जम बसवताना माओवाद्यांशी सामना अटळच. अर्थात एनएमडीसी ही सरकारी कंपनी. त्यामुळे सगळंच पाठबळ उपलब्ध. दंतेवाड्यात प्रवेश करतानाच 'नुसत्या आयडियॉलॉजीने काय होणार? खरा विकास शिक्षणानेच होऊ शकतो.' अशा आशयाचे एनएमडीसीचे बोर्डस् दिसतात. एनएमडीसीने दंतेवाड्यात २०१० पासून पॉलिटेक्निक कॉलेज सुरू केलं आहे. दंतेवाडा, बस्तरच्या भागात आरोग्य, सार्वजनिक सुविधा यासाठीही कंपनी खर्च करत असते.

एनएमडीसीने बैलाडिला डोंगरावर खाणकाम सुरू केल्यापासून भारतीय कम्युनिस्ट पक्षाने 'संयुक्त खदान मजदूर संघ' (एसकेएमएस) स्थापन करून काम सुरू केलं होतं. पुढे १९८० च्या सुमारास या भागात- दंडकारण्यात - पीपल्स वॉर ग्रुपने आपली मुळं पसरायला सुरुवात केली. पीपल्स वॉर ग्रुप म्हणजेच 'कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सिस्ट-लेनिनिस्ट) पीपल्स वॉर'. अगदी अलीकडे, म्हणजे २००४ मध्ये पीपल्स वॉर ग्रुप आणि माओइस्ट कम्युनिस्ट सेंटर ऑफ इंडिया यांच्या एकत्रीकरणातून भारतीय कम्युनिस्ट पार्टी (माओवादी) स्थापन झाली. १९६७ मध्ये नक्षलवादी चळवळ सुरू झाली ती कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सिस्ट) च्या पुढाकाराने. त्यात फूट पडून निर्माण झाली कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सिस्ट-लेनिनिस्ट). आज नक्षलवादी किंवा माओवादी हे शब्द समानार्थानेच वापरले जातात. आम्ही ज्या श्रीवास्तव

साहेबांबरोबर हिंडत होतो त्यांचा भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि डाव्या आघाडीतील मोठा घटक असणारा भारतीय मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष या दोघांहून त्यांचं हे माओवादी भावंड फार जहाल आहे. माओवादी कम्युनिस्ट पक्षावर भारत सरकारने बंदी घातली आहे आणि त्यामुळे अर्थातच माओवाद्यांना सापडले की लगेच अटक होते.

बचेलीला 'एनएमडीसी'चं साम्राज्य आहे. कंपनीच्या अखत्यारीतील भागात प्रवेश करताच कार्यालयीन इमारती, सुशोभित रस्ते लक्ष वेधून घेतात. इथेच संयुक्त खदान मजदूर संघाचं कार्यालय आहे. तिथे युनियनच्या कार्यकर्त्यांशी थोडावेळ चर्चा करून आम्ही किरंदुलला पोचलो तेव्हा अंधारून आलं होतं. किरंदुरलला पक्षाच्या निवडणूक कार्यालयाचं उद्घाटन होतं. तिथे थोडा वेळ थांबून आम्ही परतीच्या वाटेला लागलो. चारच दिवसांनी लोकसभेच्या निवडणुका होत्या.

***

''मग बॅक टू जगदलपूर?'' मन्या विचारता झाला.

''हो. आणि तिथून एक दिवसानंतर रायपूर. मग पुणे.'' मी म्हटलं.

''निवडणुकीचे निकाल मात्र प्रातिनिधिक आहेत.'' मन्या म्हणाला.

''हो. बस्तरमधून भाजपचाच उमेदवार निवडून आला. एकूण अकरापैकी दहा जागांवर भाजपचे खासदार निवडून आले. आम्ही जगदलपूरला असताना सोनी सोरीला भेटलो होतो. माओवादी असल्याच्या संशयावरून तिला अनेक महिने तुरुंगात ठेवलं होतं. तिच्यावर अनन्वित अत्याचार झाले. त्या सगळ्यातून सुटून ती 'आप'तर्फे उभी राहिली तेव्हा आदिवासी समाजाचा खरा चेहरा या निवडणुकीत दिसतोय असं वाटत होतं. पण काही उपयोग झाला नाही.'' मी.

''पण माओवाद्यांनी निवडणुकीवर बहिष्कार घातला होता ना? म्हणजे ग्रामीण भागातलं मतदान कमी होणारच होतं. आणि सोनी सोरीचा मुख्य मतदार तिथलाच होता.'' मन्या.

''हो. हे मात्र खरं.'' मी.

''अतिडाव्या विचारामुळे एक चांगला उमेदवार हरला असं म्हणायचं का?'' मन्या म्हणाला.

''अतिडाव्या विचाराला संसदीय लोकशाही मान्यच नाही मुळात. त्यामुळे चांगला उमेदवार हरल्याचं त्यांना दु:ख नाही. मुख्य म्हणजे उमेदवार

चांगला असेल तरी तो त्यांना हवे ते बदल घडवेल असंही त्यांना वाटत नाही.'' मी म्हटलं. हे म्हणत असताना सोनी सोरीची तिच्या निवडणूक प्रचारात आम्ही घेतलेली भेट मला आठवली. चाळिशीच्या आतल्या या बाई. गीदम हे त्यांचं गाव. तिथं प्राथमिक शिक्षिका म्हणून त्या काम करतात. त्यांच्यावरील बहुतांश आरोप आता मागे घेतले गेले आहेत. त्या आम्हांला सांगत होत्या, माओवाद्यांशी माझे कधीच संबंध नव्हते. आताही मला बंदुकीपेक्षा शिक्षणाच्या माध्यमातून माझ्या आदिवासी बांधवांसाठी काम करायचंय. त्यांनी त्यांचं संकल्पपत्र एक हजार रुपयांच्या स्टँपपेपरवर छापून प्रकाशित केलं होतं. यात त्यांनी पन्नास मुद्दे मांडले होते आणि एक्कावन्नावा मुद्दा असा होता की निवडून आल्यावर बदल अथवा बदलाची सुरुवात तुम्हाला दिसली नाही तर मतदारांनी मला 'रिकॉल' करावं. हे संकल्पपत्रच माझा राजीनामा म्हणून समजावं. संकल्पपत्रात सार्वजनिक सुविधा, प्रशासकीय सुविधा याबाबतचे बरेच मुद्दे अंतर्भूत होते. एनएमडीसी आणि एस्सारसारख्या कंपन्यांमुळे विस्थापित झालेल्या लोकांना रोजगार मिळावा म्हणून मी प्रयत्न करेन, तसेच विस्थापित कुटुंबांना त्यांच्या जमिनीचा आणि श्रमाचा मोबदला मिळेल यासाठीही मी प्रयत्न करेन असं त्यांनी म्हटलं होतं. मात्र टाटा, एस्सार या खासगी उद्योगांना खाणकामाची कंत्राटं देण्याबाबत त्यांची काय भूमिका आहे याचा उल्लेख नव्हता.

''अतिडाव्या विचाराचं एक रोमँटिक आकर्षण बऱ्याच बुद्धिजीवी लोकांना असतं. हे लोक स्वत: एक दिवस अचानक पुण्याहून मुंबईला जावं लागलं तर आयत्या वेळी तिकीट काढून जायला बिचकतात. त्यांना रिझर्वेशनशिवाय जमत नाही. स्वत:ची सगळी प्रॉपर्टी सुरक्षित ठेवून त्यांना पार्टटाईम क्रांती करायची असते. अशा लोकांच्या प्रभावाखाली येऊन बिघडू नकोस रे बाबा.'' मन्याने माझी लिंक तोडली.

''असंच काही नाही. अतिडाव्या चळवळीत कोबाद गांधी आणि अनुराधा गांधीसारखी संपूर्णपणे डीक्लास झालेली माणसं होती. तू समजतोस इतकं सगळंच काही उथळ नाहीये.'' मी म्हटलं.

''मग चांगलंच आहे. पण तुला स्वत:ला नक्षली-माओवादी विचारांचा मार्ग पटतो का?'' मन्याने विचारलं.

हा मात्र कळीचा प्रश्न होता. मीच कशाला, पण अगदी भल्या जाणत्या विचारवंतांची विकेट काढणारा. 'विचारधारा म्हणावी तर पटते पण हिंसेचं

तत्त्वज्ञान नाही पटत' असं नेहमीचं उत्तर देता येतंच, पण त्याने भागत नाही. कारण अतिडाव्या चळवळीच्या पोटात शिरून मागे मागे जाऊ लागलं की सरंजामशाही, जातिव्यवस्था यांची भयावह दडपशाही, लोकशाही रुजवण्यात आलेलं अपयश आणि या सगळ्याविरुद्धचा हिंसक उद्रेक दिसू लागतो आणि मग शोषितांनी शस्त्र का उचलायची नाहीत असा प्रश्न पडतो. अर्थात १९६९ मध्ये नक्षलबाडीत झालेला पहिला उठाव, तेव्हाची परिस्थिती आणि २०१४ मधला नक्षलवाद यांत तुलना व्हावीच. मूल्यमापन व्हावंच. कारण नक्षलवादी हिंसेचं, विशेषत: त्यात भरडल्या जाणाऱ्या निष्पापांचं वर्तमान फारच अस्वस्थ करणारं होतं. पण 'हिंसा नको' असं म्हणताना आपण एका सुरक्षित स्थानावरून हे बोलतो आहोत हे जाणवत राहतं.

''काय रे?'' मन्याने मला हलवलं.

''अं? हो, तुझा प्रश्न कळला. पण याचं उत्तर देणं अवघड आहे अरे.'' मी म्हटलं आणि मन्यालाच विचारलं, ''तुला काय वाटतं?''

मन्या चमकला. त्याने बहुतेक उलट्या प्रश्नाची अपेक्षा केली नसावी. पण तो निग्रहाने म्हणला, ''निर्णय हो-नाही मध्येच हवा असेल तर मी म्हणेन नाही.''

मी हसून म्हटलं, ''हो-नाही मध्ये उत्तर तू मागत होतास. मी मागतच नव्हतो. आता तिथल्या आदिवासींच्या जगण्याबद्दल म्हणशील तर हे खरंच आहे की त्यांची दोन्हीकडून कुचंबणा होते. शासन त्यांना विस्थापित करतं आणि माओवादी त्यांना बंदूक देऊ बघतात. विस्थापित झाले तर झगडून त्यांना काही मिळवता तरी येईल, पण त्यांनी बंदूक हातात घेतली तर देशाचे गुन्हेगार ठरतील पण खरं तर त्यांना कुठे काय मिळालंय विस्थापनाच्या मोबदल्यात आजवर? मायनिंगसारख्या महाकाय प्रोजेक्टमुळे त्यांची जमीन, पाणी, जंगलं सगळंच गेलं. जातंय. तुला आश्चर्य वाटेल, पण गेल्या वर्षी जयराम रमेशनी हे स्वत: एका व्याख्यानात मान्य केलंय की आदिवासींचं शोषण झालेलं आहे. खासगीच नव्हे, तर सार्वजनिक कंपन्यांकडूनही. आणि माओवाद्यांनी या अन्यायाबाबत आपल्याला जागं केलं. पुढे ते असंही म्हणतात की माओवाद्यांचा मुकाबला लष्करी बळाने नाही तर राजकीय पद्धतीने केला पाहिजे. हिंसेचा मार्ग योग्य की अयोग्य हे आपण सांगणं अवघड असतं अरे. उद्या एखादं धरण बांधायचं म्हणून तुझं घर पाण्याखाली गेलं किंवा एखादा मोठा कारखाना लावायचाय म्हणून तुझी जमीन सरकारने घेतली तर तू शांतपणेच ते सहन करशील याची तुला खात्री

आहे? मन्या, मला वाटतं हिंसा ही एक अत्यंत थेट प्रतिक्रिया आहे. तिने प्रश्न सुटतो का? नाही कदाचित. पण तू असं बघ की दोन हजारच्या दशकापर्यंत, भारतातील १० राज्यांतील १८० जिल्ह्यांत माओवादी कार्यरत होते. आत्ताच्या ताज्या सरकारी आकड्यानुसार ती संख्या ८३ आहे. कमी आहे. पण हे लोण इतक्या झपाट्याने पसरलं याचा अर्थ काय? शासनाची दडपशाही, जातीयता याची झळ आपल्याला बसत नाही. आपण शहरं वाढताना बघतो. ती कशी वाढतात हे तुलाही माहीत आहे. शहरं वाढतात, वस्तूंच्या गरजा वाढतात, मग उत्पादन वाढवणं आलं. उत्पादन वाढवायचं म्हणजे कच्चा माल हवा. म्हणजे मग निसर्गाकडे जाणं आलं. निसर्ग कुठे आहे? बैलाडिलाच्या डोंगरावर. तिथे खाणकाम करायचं म्हणजे स्थानिकांना हटवणं आलं. ते स्टील वापरतच नाहीत, पण आपण वापरतो म्हणून त्यांना तिथून उठावं लागतं.'' मी धडाधड बोलत होतो.

''मान्य. पण मग असं असतंच. ज्या आदिवासी पाड्यावर वीज आहे ती वीजदेखील त्यांनी निर्माण केलेली नाही. दुसरीकडूनच आलेली आहे. मग आता असं म्हणायचं का की हे आदिवासी शोषक आहेत? या हिशेबाने आपण सगळे एकाच वेळी शोषक आणि शोषित नसतो का?'' मन्या म्हणाला.

''वीज वापरतात ते ठीक. पण जेव्हा भारनियमन होतं तेव्हा तिथे दहा-बारा तास होतं हे तू विसरतोस. आधी शहरांनाच वीज दिली जाते.'' मी.

''अरे, पण शहरं महसूलपण देतात. त्याचं काय?'' मन्या.

''हो, पण तो खर्चही तिथेच होतो ना! म्हणजे सोर्स लांब कुठंतरी आहे. तिथल्या मालाचं प्रोसेसिंग आणि विक्री इथे होते. त्यावर शासन आणि नागरी समाज जगतात. आणि त्या लांबवरच्या सोर्सपाशी त्यांच्या पद्धतीने शांतपणे राहणारे मात्र देशोधडीला लागतात. हे अस्वस्थ करणारं नाही वाटतं तुला?'' मी विचारलं.

''मी तुझी संवेदना समजू शकतो. पण तू संवेदना अंतिम आहे असं प्लीज मानू नकोस. तुला काय वाटतं? भौतिक प्रगती कशी साध्य होत गेली आहे? आधी नदी पार करून जायला नावा होत्या. त्यामुळे नावाड्यांना रोजगार मिळायचा. पण म्हणून पूल बांधणीचं तंत्र विकसित झालंच ना? 'पूल नको' असं आपण म्हणालो का? हे एक उदाहरण झालं, पण हे सगळीकडे लागू होतं असं नाही तुला वाटत?'' मन्या.

''म्हणजे तुला असं म्हणायचंय की कुठल्याही टप्प्यावर काही माणसांच्या वाट्याला उपेक्षा येणारच?'' मी.

''तू संवेदना बाजूला ठेवून विचार कर आणि उत्तर शोध. तुम्ही भौतिकतेचा प्रवाह थांबवू शकता का हा प्रश्न आहे आणि त्याचं उत्तर नाही असं आहे.'' मन्या म्हणाला.

''भौतिकतेचा प्रवाह थांबवायचा नाही म्हणजे मानवीय दृष्टिकोनाला तिलांजली द्यायची? एखादी मोठी योजना आखताना लोकांचा विचारच करायचा नाही? अरे मग 'गव्हर्नन्स'चा अर्थ काय?'' मी.

''हो. 'गव्हर्नन्स'चं मोठं फेल्युअर आहे हे मान्यच आहे.'' मन्या म्हणाला.

मन्याच्या कबुलीनंतर मी अधिक काही बोललो नाही. छत्तीसगडमध्ये पत्रकार मित्रांबरोबर घालवलेला आठवडा अपरिहार्यपणे अस्वस्थ करणारा असणार होता याची मला कल्पना होतीच आणि पुण्याला परतल्यावर 'कधी भेटतोस?' हा बोडसाचा मेसेज वाचल्यावर मन्याशी बोलताना आपली अस्वस्थता अपरिहार्यपणे बाहेर पडणार हेही मला कळत होतं. अर्थात 'गव्हर्नन्स' या मुद्यावर मन्याचं एकमत झालं असलं तरी 'गव्हर्नन्स' उभा राहतो आयडियॉलॉजीवर' हा माझा पुढचा मुद्दा आणि पुढची चर्चा मी टाळली. कारण गव्हर्नन्स, भौतिक प्रगती, विकास या सगळ्याच्या मुळाशी कुठली आयडियॉलॉजी असावी, मुळात एकच मार्गदर्शक आयडियॉलॉजी असावी का यावर मंथन करणं म्हणजे दंडकारण्यात शिरून वाट शोधण्याइतकं अवघड होतं!

(पूर्वप्रसिद्धी - मिळून साऱ्याजणी, ऑगस्ट २०१४)

ईमेल : utpalvb@gmail.com

# साक्षात्कारांमागील वैज्ञानिक सत्य : १

*डॉ. रवीन्द्रनाथ टोणगावकर*

धर्मसंस्थापक, संत, साक्षात्कार, सत्य, विज्ञान

---

कोट्यावधी माणसे शेकडो वर्षांपासून देवाची उपासना, तसेच विविध प्रकारची आध्यात्मिक साधना करीत आले आहेत व त्यातून त्यांना 'बरे वाटते' असा दावा करीत आली आहेत. ही अनुभूती, तसेच साक्षात्कार ह्या संकल्पनेमागील वैज्ञानिक सत्य प्रतिपादन करणारा हा लेख तुमच्या विचारांना चालना देईल.

---

मी स्वतःवर केलेल्या प्रयोगातून एक गोष्ट माझ्या लक्षात आली. ती म्हणजे, एखाद्या कल्पनेवर, किंवा विचारावर आपण सातत्याने, मनापासून, गंभीरपणे दिवसेंदिवस लक्ष केंद्रित केले, त्याचेच ध्यान केले, तर ज्याला आध्यात्मिक भाषेत साक्षात्कार म्हणतात तसा अनुभव काही व्यक्तींना येऊ शकतो. हा साक्षात्कार कोणता आणि कसा असावा हे त्या व्यक्तीची जडणघडण, तिच्यावर झालेले संस्कार, संगोपन, अध्यापन आणि प्रामुख्याने त्यावेळची सामाजिक परिस्थिती, अशा अनेक बाबींवर अवलंबून असते. आपल्या ऋषिमुनींना आणि जगातील अनेक प्रेषितांना, धर्मसंस्थापकांना आणि प्रामाणिक संतमहात्म्यांना, स्वामी महाराजांना असा साक्षात्कार - ज्ञानप्राप्ती - झाली असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यांतील अनेकांनी त्यानंतर त्यांचे विचार आणि शिकवणूक जगाला देऊन जगाच्या कल्याणाकरता आपले सर्व जीवन समर्पित केले आहे हेही सत्य आहे. हे सर्वच सदासर्वकाळ आदरणीय आणि वंदनीय आहेत आणि भविष्यातही तसेच राहतील याची मला शंका नाही.

**दैवी साक्षात्कार की मानवी अंतर्मनाची हाक?**

अशा साक्षात्कारांचे, प्रकटीकरणाचे सुंदर विवेचन गुरुदेव डॉ. आर. डी. रानडे यांनी त्यांच्या 'A Constructive Survey of Upanishadic

Philosophy' या ग्रंथात केले आहे. त्यांच्याच शब्दांत (मूळ इंग्रजीचा मराठी माझा अनुवाद) सांगायचे झाल्यास ते खालीलप्रमाणे ः-

**साक्षात्काराचा अर्थ** (Meaning of Revelation) :

सर्व वेद, ब्राह्मणे, उपनिषदे यांना अनंत काळापासून श्रुती म्हणतात. एवढेच काय, जगातील सर्वच धर्मांचे मूळ ग्रंथ हे ईश्वरानेच त्यांच्या मूळ संस्थापकांना सांगितले असे मानले जाते. कोणाला ते विजेच्या कडकडाटातून मिळाले, तर कोणाला ध्वनीच्या, शब्दाच्या माध्यमांतून मिळाले, कोणाला ते बाहेरून मिळाले, तर कोणाला अंतर्मनातून. वेद-उपनिषदांप्रमाणेच बायबल आणि कुराण ही ईश्वराचीच देणगी आहे असे मानले जाते. प्रस्तुत लेखकाच्या मते (गुरुदेव रानडे) हे ज्ञान कोणत्याही बाह्य गोष्टींकडून आलेले नसून, त्या त्या व्यक्तींना देवाच्या विचारांचा कैफ चढल्यामुळे किंवा त्या विचारांनी आलेली उन्मादावस्था, झिंग (God Intoxication) या अवस्थेत स्वतःच्याच अंतर्मनातून आलेले जे विचार असतात त्यांनाच या सर्व व्यक्ती साक्षात्कार किंवा दैवी संदेश म्हणतात. याचमुळे सेंट पॉल (येशू ख्रिस्ताचा संदेश देणारा सुरुवातीचा धर्मगुरू) म्हणाला, की तो स्वतः बोलत नसून त्याच्या मुखातून प्रत्यक्ष देवच बोलतो आहे.

ख्रिस्तपूर्व 400 वर्षांपूर्वी झालेला ग्रीक तत्त्ववेत्ता प्लेटो म्हणतो, "ही सर्व महाकाव्ये, स्तवने त्या-त्या व्यक्तींना झपाटलेल्या अवस्थेत, अक्षरशः ईश्वर कल्पनेने वेडावलेल्या अवस्थेत (Divine Insanity) सुचलेली काव्ये आहेत."

गुरुदेव रानडे शेवटी असा निष्कर्ष काढतात, की वेद आणि उपनिषदे ही पौरुषेय आहेत की अपौरुषेय या वादात न पडता इतर सर्व धर्मांच्या प्रमाणेच ही स्तवने ईश्वरकल्पनेच्या उन्मादावस्थेतच (God Intoxication) पूर्वीच्या ऋषिमुनींनी म्हणजे माणसांनीच रचलेली काव्ये आहेत. (यांत देवाचा काही संबंध नाही.) या सर्व गोष्टी का व कशा होतात हे आधुनिक विज्ञानाद्वारे आता सिद्ध करता येते. संशोधक अँड्र्यु न्यूबर्ग आणि ओॲक्विली यांनी 2001 साली लिहिलेल्या 'Why God won't go away' या पुस्तकात त्यांनी खालील सत्य प्रयोगाने सिद्ध करून दाखविले आहे.

**साक्षात्काराचे वैज्ञानिक स्पष्टीकरण**

बौद्ध भिक्खू ध्यानधारणा करत असताना त्यांच्या आणि रोमन कॅथॉलिक चर्चमध्ये येशूची मनोभावे तल्लीन होऊन प्रार्थना करत असताना तेथील नन्सच्या

मेंदूंचे स्कॅन केले असता असे आढळून आले, की त्यांच्या मेंदूतील Posterior Superior Parietal Lobe या भागाची विद्युत कंपने (Electrical Activity) अगदी खालच्या पातळीवर सुरू होती. मेंदूच्या या भागाला त्यांनी Orientation Association Area (OAA) असे संबोधले. या मेंदूच्या भागाचे काम असे असते, की त्यामुळे आपल्याला (डोळे मिटून घेतले तरी) अवकाशातील आपली स्थिती काय आहे हे कळते. उदाहरणार्थ आपण बसलो आहोत, उभे आहोत, झोपलेले आहोत, तेही कोणत्या कुशीवर, की डोके खाली करून पाय वर करून शीर्षासन करत आहोत याची जाणीव होते. या भागाची क्रिया जेव्हा व्यवस्थित सुरू असते तेव्हा आपल्याला आपल्या स्वतःच्या शरीराच्या स्थितीची आणि बाह्यजगताची वेगवेगळी जाणीव पूर्णपणे होत असते. परंतु आपण जेव्हा गाढ झोपेत असतो किंवा ध्यानधारणा करत असतो किंवा वर सांगितल्याप्रमाणे प्रार्थनेत मग्न असतो, तेव्हा मेंदूची ‘स्व' आणि इतर जग यांच्या भेद्भावाची जाणीव बोथट होते किंवा जवळजवळ नष्ट होते आणि यामुळे शरीराची प्रत्यक्ष वस्तुस्थिती (reality) आणि काल्पनिक विलक्षण संवेदना (fantasy) अशी होते, की आपण स्वतः या शरीरात आहोत की शरीराबाहेर भरकटतो आहोत हेच समजेनासे होते. कदाचित मेंदूच्या या भागाच्या अशा वागण्यामुळेच ध्यानस्थ ऋषिमुनी, सर्व प्रेषित, बौद्ध भिक्खू आणि साधुसंतांनी आपल्या "स्व'त आणि या सर्व विश्वात काहीही फरक नाही, हे सर्व एकच आहे – ‘अहं ब्रह्मास्मि’ आणि ‘सर्वम् खलु इदं ब्रह्म' अशी जाणीव होत असते किंवा नन्सना ईश्वराचे अस्तित्व असल्यासारखा भास होतो. असाच भास - ज्या व्यक्ती आपण परग्रहावरून आलेल्या यानात जाऊन त्या परग्रहवासियांना प्रत्यक्ष भेटून आलो आहोत असा दावा करतात, त्यांना होतो. आणि या सर्वांना हे अनुभव खरेच आहेत असे कायम वाटत राहते. मेंदूच्या त्या भागास जेव्हा इजा होते, तेव्हा त्या व्यक्तींनाही असे अनुभव येतात. अशा व्यक्तींना तर घरात फिरतानाही रोज अडथळ्यांच्या शर्यतीतून गेल्यासारखे वाटते.

प्रत्यक्षात हे सर्व भास असून मेंदूतील रसायनांचा परिणाम असतो. हे आजच्या प्रगत मेंदूशास्त्रामुळे आणि Functional Magentic Resonance Imaging (FMRI) आणि पेट स्कॅन (PET Scan – Positron Emission Tomography) अशा अत्याधुनिक (पण महागड्या) उपकरणांमुळे सिद्ध करता आले आहे.

मेंदूच्या या (Orientation Association Area - (OAA) भागांत ध्यानधारणा, प्रार्थना, इजा किंवा अन्य काही कारणांमुळे होणाऱ्या बदलांमुळे निर्माण होणारे आभास हे सार्वत्रिक आणि साधारणपणे एकसारखे असल्यामुळेच जगातील यच्चयावत ऋषिमुनी, धर्मसंस्थापक, प्रेषित, साधुसंत आणि तत्त्वज्ञ ह्यांनी हे सर्व जग एकच आहे, एकाच देवाची आपण लेकरे आहोत, कोणत्या तरी एकाच अज्ञात शक्तीने (Consicousness – चैतन्यब्रह्म, चित्शक्ती) हे निर्माण केलेले आहे, असे प्रतिपादले आहे. कारण थोड्याफार फरकाने सर्वांना झालेले 'साक्षात्कार' (Revelation) हे सारखेच होते; आणि ही क्रिया गेली चार-पाच हजार वर्षांपासून , माणूस विचार करू लागला तेव्हापासून, सतत सुरू आहे. आता अशा उन्मादावस्थेत निर्माण झालेल्या तत्त्वज्ञानावर ते सनातन, पुरातन, शतकानुशतके चालत आले आहे; आपल्या ज्ञानी पूर्वजांनी ते सांगितल्यामुळे 'तेच अंतिम सत्य आहे' असा भाबडा विश्वास ठेवून त्याप्रमाणे वागावे, की हे सर्व ज्ञान, हा ईश्वर या सर्व भ्रांत कल्पना आहेत असे आपल्या विवेकबुद्धीला पटल्यामुळे त्याप्रमाणे विवेकाने वागावे, हा ज्याचा-त्याचा प्रश्न आहे.

हे जरी खरे असले, तरी जगातील सर्वच धर्मपंथीय, त्यांचे मूळ ग्रंथ हे देवाकडूनच आले आहेत असे मानतात. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध बोलणे, त्यांच्यावर कोणीही शंका घेणे हे पापी कृत्य आहे असे समजतात. त्यामुळे वेद, उपनिषदांविरुद्ध; बायबल, कुराणाविरुद्ध बोलणे हे धर्मनिष्ठांनी – सनातन्यांनी कधीही खपवून घेतले नाही; आणि असे कृत्य कोणी केल्यास त्याला शिक्षा देण्याचे कामही हे धर्ममार्तंड करत असतात.

**आधुनिक ऋषिमुनी आणि त्यांचे साक्षात्कार**

असे म्हटले जाते, की वेद, उपनिषदे रचणारे ऋषिमुनी आणि आधुनिक शास्त्रज्ञ यांचे एकच लक्ष्य होते आणि आहे. ते म्हणजे, या चराचर विश्वाचे, सजीव-निर्जीवांबद्दलचे गूढ उकलून काढणे आणि अंतिम सत्याचा सोध घेणे; आणि हे करत असताना प्राचीन ऋषिमुनींप्रमाणेच आजचे शास्त्रज्ञही उन्मादावस्थेत जातात, त्यांनाही त्यांच्या शोधांच्या विचारांची झिंग चढते आणि त्या अवस्थेत साक्षात्कार प्रकटीकरण होते.

आर्किमिडीजला राजाच्या मुकुटात खरे सोने किती आणि भेसळ किती हे शोधण्याचा वस्तुमानाचा फॉर्मुला , तो आंघोळीच्या टबमध्ये बसला असताना सापडला आणि तसाच 'सापडले, सापडले' (युरेका, युरेका) करत तो

नग्नावस्थेतच पळायला लागला, अशी वंदता आहे; तर केकुले (इ.स.1890) या शास्त्रज्ञाला सात वर्षांच्या अथक परिश्रमानंतर बेंझिन या द्रव्याचे रिंगसारखे असलेले सूत्र (Benzene Ring), त्याच्या दिवास्वप्नात, साप आपल्या स्वतःच्या तोंडात आपलीच शेपटी धरून गोल-गोल फिरत आहे असे दिसल्यामुळे सापडले.

इ.स.1666 साली न्यूटनला झाडावरून जमिनीवर पडलेल्या सफरचंदाकडे पाहून गुरुत्वाकर्षणाचा शोध लागला, तर 1905 साली महान शास्त्रज्ञ अल्बर्ट आइन्स्टाइनच्या डोक्यात सापेक्षतावादाचा सिद्धान्त (Theory of General Relativity) हा विषय आला. खरे तर या सर्व शास्त्रज्ञांना, अंतिम सत्याच्या शोधात असलेल्या आजच्या ऋषिमुनींना, वेदकालीन ऋषिमुनींप्रमाणेच किंवा येशू ख्रिस्त किंवा मोहम्मद् पैगंबराप्रमाणे साक्षात्कार झाले होते. पण त्यांनी 'हे ईश्वरीय ज्ञान असून ते खरेच आहे त्याविरुद्ध कोणी बोलणे किंवा त्याच्यावर आक्षेप घेणे खपवून घेतले जाणार नाही' असे न करता अनेक वर्षे त्या विषयावर सतत अभ्यास आणि प्रयोग करून त्यांचे म्हणणे, त्यांचे तत्त्वज्ञान सर्व जगाला खरे करून दाखवले. आइन्स्टाइनने 1905 साली स्फुरलेली आपली थिअरी दहा वर्षांच्या अथक प्रयत्नांनंतर 1915 साली सिद्ध करून दाखवली. न्यूटनला सफरचंदाचे फळ पडल्यानंतर सुचलेली थिअरी जगाला सांगणारे पुस्तक Philosophiae Naturalis Principia Mathematica (Mathematical Principles of Natural Philosophy) लिहिण्यास 21 वर्षे अभ्यास करावा लागला. 1687 साली त्याचे या विषयावरील पुस्तक प्रसिद्ध झाले. न्यूटनचे बरेच सिद्धान्त आजही जरी खरी असले, तरी दोनशे वर्षांनंतर आइनस्टाइनने त्यातील काही चुकीचे ठरवले आहेत, तर आइनस्टाइनच्या थिअरीवरही आता आक्षेप घेतले जात आहेत.

याउलट वेद, उपनिषदे, बायबल, कुराण यांत दिलेल्या तत्त्वज्ञानाबद्दल कोणीही पुढे संशोधन केले नाही आणि ते सर्व खरेच आहे, ते ईश्वराने सांगितले आहे हे सिद्ध करून दाखवण्याचा किंवा त्यांचा खरेपणा सिद्ध करण्याचा कोणीही प्रयत्न केला नाही. उलट, या तत्त्वज्ञानाविरुध्द् बोलणे, वागणे खपवून न घेता अनेक धर्मयुद्धे करून लाखो लोकांचे प्राण घेतले गेले आहेत. (उत्तरार्ध पुढील अंकी )

ईमेल : rrtongaonkar@gmail.com

# प्रतिसाद

(1)

मे 2016 च्या संपादकीयात आपण वाचकांच्या संवादहीनतेबद्दल चिंता प्रकट केली आहे, ती शंका रास्त असली तरी तिला दुसरी बाजूही आहे. कोणत्याही नियतकालिकाचा वाचक हा त्या नियकालिकाचा फक्त शिष्य असावा/व्हावा, त्याचे (वाचकाचे) मित्रत्व मान्य होणार नाही, ही विचारधारा बहुतेक नियतकालिक चालकांची असते. शिष्यत्व म्हणजे जुन्या परिभाषेत एक पायरी खाली व मित्रत्व म्हणजे समपायरीवरील, असा हा प्रकार आहे. काही वाचकांना, किंबहुना बहुतेक वाचकांना शिष्यत्व मान्य नसून ते मित्रत्वाची अपेक्षा करतात, परंतु त्यांची ती अपेक्षा म्हणजे नियकालिकाच्या ध्येय धोरणाला, विचारधारेला विरोध अशी भावना संचालकांच्या मनात सुप्तरूपाने का होईना अवतरित झालेली असते. त्यामुळे वाचकांच्या पत्रांना कोणताही प्रतिसाद न देणे, ही वृत्ती बळावू लागते. अशाने वाचकही अलिप्त होत होत दूरावतो व अशा नियतकालिकांना अकाली मृत्यूला सामोरे जावे लागते. यासंबंधाने मला मे 2016 अंकातीलच संजय संगवई यांच्या लेखातील शेवटच्या परिच्छेदातील एक वाक्य उद्धृत करावेसे वाटते. ते वाक्य असे - ''स्वतःची मूल्ये कायम ठेवून नव्या, 'इतर' गोष्टी सामावून घेऊन संस्कृती वाढत, समृद्ध होत जाते.'' या वाक्यातील 'संस्कृती' या शब्दाच्या जागी 'विचार' किंवा 'विचारधारा' हा शब्द ठेवल्यास मला काय म्हणावयाचे आहे हे स्पष्ट होईल.

कोणत्याही नियकालिकासाठी वाचक हा घटक प्रथम महत्त्वाचा असतो, हे सांगावेच लागत नाही. तरी वाचकांच्या विचार, अ-विचार, कुविचारांकडे मात्र दुर्लक्षच करण्याची प्रवृत्ती जास्त प्रमाणात आढळते. मी सुमारे 30-31 नियतकालिकांचा वैयक्तिक ग्राहक/वाचक आहे. त्यांतील बहुतेकांमध्ये मला हीच कम्युनिकेशन गॅप दिसून येते. 3-4 नियतकालिकांमध्ये मी वाचकांच्या पत्रव्यवहाराला जागा मिळवून दिल्याचे मला अल्पसमाधान असले तरी यात आणखी वाढ व्हावी असे मला वाटते.

सुमारे 25-30 वर्षांपूर्वी पुण्याहून (कदाचित) प्रपंच प्रकाशनाने (भूलचूक देणे घेणे) 'मला काही सांगायचंय' या नावाचे फक्त वाचकांच्या

पत्रव्यवहाराला वाहिलेले पाक्षिक सुरू केले होते. (मी त्याचा ग्राहक/वाचक/पत्रलेखक होतो.) परंतु थोड्याच कालावधीत वाचकांच्या पत्रांच्या अभावी त्यांना ते पाक्षिक बंद करावे लागले. (मला वाटते हा प्रयोग संपूर्ण जगातील प्रथम व एकमेव असावा.) यावरून वाचकही किती निष्क्रियतेने वागतात, हेसुद्धा सिद्ध होतेच. असे असले तरी वाचकांच्या पत्रव्यवहाराला पुरेशी जागा देणारे 'अंतर्नाद' सारखे नियकालिक आहेतच व त्यांना वाचकांची पत्रे छापण्याला जागाही अपुरी पडते, इतकी पत्रे येतात असे जाणवते.

एकंदरित 'वाचकांची संवादहीनता' ही एकतर्फी बाब नसून ती नियकालिक <===> वाचक अशी दूतर्फा बाब आहे व त्यासाठी नियत-कालिकांच्या संचालकांनी काही प्रमाणात बदलणे आवश्यक आहे, असे माझे मत आहे. वाचकांना शिष्य बनविण्याऐवजी त्यांना मित्र बनवावे, म्हणजे वाद-संवादातून विचार-प्रसार तर घडेलच, वाचकांनाही विविध विचारधारांचा परिचय होईल, पर्यायाने नियतकालिकाचाही प्रसार होईल असे मला वाटते. असो.

शेवटी 'पसंद अपनी-अपनी, खयाल अपना-अपना' हे आहेच. कळावे, ही विनंती.

- लखनसिंह कटरे

*मु.पो.बोरकन्हार, ता. आमगांव, जि.गोंदिया – 441902*

*चलभाष :: 07066968350*

(2)

आजचा सुधारक, 3 मे 2016 चा अंक.

संजय संगवई यांचा लेख अप्रतिम आहे. तरी पण भातखंडे यांच्या पुस्तकातून अशिक्षित मुसलमान कलावंत यांचे वर्तन चांगले नसते असे त्यांनी म्हटले आहे. भातखंडे हिंदुत्ववादी नव्हते आणि चांगल्या मुसलमान गायकांना व्यवस्थित दाद देत असत.

"कट्यार काळजात घुसली" या चित्रपटात मात्र हिंदू-मुसलमान संघर्ष दाखवला आहे. दारव्हेकारांना असा संघर्ष दाखवायचा नव्हता असे मला वाटते.

चतरसिंग जाम यांचा लेख फारच चांगला वाटला. अशा रीतीनेच सगळीकडे कामे व्हायला हवीत. जाणकारअर्थशास्त्रज्ञ व कृषी तज्ञांची भंबेरी उडणार नाही.

सुरेश सावंत यांचाही लेख चांगला आहे. जे एन यु चे कन्हेय्या कुमार फार चांगले किंवा फार वाईट असतील असेमला वाटत नाही. जे एन यु चे कन्हेय्या कुमार एक सर्वसामान्य विद्यार्थी युनियनचे लीडर असतात तसे आहेत. Social Studies ला (विशेषतः मार्क्सवादी) social sciences म्हणतात कारण Natural Sciences शी History चे साम्य दाखवायचे असते. 'मिल्ग्रम प्रयोग" या मुळी यांच्या लेखात Social sciences आणि natural sciences यातले मूलगामी फरक दाखवले जातील असे वाटले होते. मिल्ग्रमप्रयोग विघातक आहेत हे उघडच आहे. प्रदीप पुरंदरे यांनी वर्णन केलेली पात्रे सिनेमात दिसतात. चांगले राजकारणी किंवा धूर्तराजकारणी अश्या तर्हेने बोलतात असे मला वाटत नाही. वाईट राजकारणी डाव्या आणि उजव्या दोघांमधे सापडतात. प्रदीप पुरंदरे डावे असावेत असे मला वाटते.

उत्पल व.बा. यांच्या लेखात डावी बाजू म्हणजे विज्ञान-आधारित जीवन आणि उजवी बाजू म्हणजे धर्माधारित राज्य अशी समजूत दिसते. हे दोन शब्द खरे म्हणजे स्टेट आर्थिक कंट्रोल किंवा आणि निजी आर्थिक स्वतंत्रता या अर्थाने आहेत. बदल हवा हे मत जाणकार डाव्यांचे आणि जाणकार उजव्यांचेही आहे. उजवा विचार (म्हणजे RSS नाही) सगळं सोपं करतो आणि डावा विचार मात्र खरा असे उत्पल व.बा. यांचे मत दिसते. चांगले विश्लेषण आणि सखोल विचार सगळेच चांगले विचारवंत करतात. ती डाव्यांची मक्तेदारी नाही. गरीब गरीब का आहेत या महत्त्वाच्या प्रश्नाचा विचार सगळेच चांगले विचारवंत करतात.

शेवटी संपादकीय. "बाजारशरण" या शब्दावर माझा आक्षेप आहे. व्यवसाय म्हटले म्हणजे नफा हा आलाच. वाईट मार्गाने नफा मिळवण्यावर निर्बंध हवेत पण कायदेशीर मार्गाने नफा कमावणारे पण भरडले जाऊ नयेत. बाजार या शब्दाला वाईट वास आहे. मार्केट या शब्दाला नाही. सरकारी नियम बरोबर असतील तर मार्केट चांगल्या वस्तूंनाच आणि योग्य भावालाच प्रोत्साहन देतो वाईट वस्तूंना आणि अयोग्य भावाला नाही

मुकेश अंबानीच सरकारी नियम बनवतो असे आपले म्हणणे असेल तर वादविवाद नंतर केव्हातरी करावा लागेल.

*-- वसंत केळकर*

कविता

# वात्सल्याचे तपशील

एकदा पाणभिजला ऋतु येऊन गेला म्हणजे
शिवारावर श्वासांची लागवड सुरू होते
पाखरे
ओठांच्या काठांवर झाडांची हिरवी पाने ठेवतात
पाखरांकडून
खुलेपणाने
कोरसपमध्ये
सूर्याचे गाणे गायिले जाते
सगळा आसमंत गणगोत होऊन
माणसांच्या भेटीला येतो
वासरांच्या वात्सल्याचे तपशील
गायींच्या डोळ्यांत; डोळाभर झालेले असतात
एवढेच
शील :
झाडांचे, शिवारांचे, पाखरांचे.

- *केशव सखाराम देशमुख*

( *चालणारे अनवाणी पाय* ह्या काव्यसंग्रहातून , पद्मगंधा प्रकाशन )